रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ३१८
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, ५ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

शिक्षक व पदवीधर निवडणूक मतदानाच्या वेळेत वाढ/२
मोरबे धरणातील जलसाठ्यात घट; विभागवार पुरवठा बंद/६
सॉफ्ट टेनिस चॅम्पियनशिपमध्ये प्रतीक्षा शेरकरला कांस्यपदक/८

# एनडीएची सरशी

## लोकसभा निवडणुकीत भाजप, मित्रपक्षांना बहुमत



**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) एकूण ५४३पैकी सुमारे २९३ जागांवर विजय संपादन केला आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी मिळून २३३ जागांवर आघाडी घेतली आहे, तर अपक्षांच्या पारड्यात १७ जागा गेल्या. रात्री उशिरापर्यंत कल स्पष्ट होऊ शकले नाहीत.

मतमोजणीस मंगळवारी (दि. ४) सकाळी ८ वा. सुरुवात झाली. भाजप २४० जागांसह सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. काँग्रेसने ९९ जागांवर, सपाने ३५हून अधिक जागांवर विजय मिळवला, तर तृणमूल काँग्रेसने २९ व द्रमुकने २२ जागा मिळवल्या आहेत. बहुमतासाठी २७२ हा बहुमताचा आकडा आहे, जो एनडीएने पार केल्याचे चित्र आहे.

## तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार -पंतप्रधान मोदी



आम्ही जनतेचे आभारी आहोत. देशवासीयांनी भाजपवर, एनडीएवर पूर्ण विश्वास दाखवला. तुमच्या या प्रेमासाठी मी सर्वांचा ऋणी आहे. आता एनडीएचे सलग तिसऱ्यांदा सरकार बनणे निश्चित आहे. आजचा विजय देशाच्या लोकशाहीचा विजय आहे. सबका साथ, सबका विश्वास या मंत्राचा विजय आहे. १४० कोटी जनतेचा विश्वासाचा विजय आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. भाजप व मित्रपक्षांच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी पंतप्रधान मोदी पक्षाच्या मुख्यालयात आले होते. त्या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आमचे विरोधक एकत्र येत इतक्या जागा जिंकू शकल्या नाहीत ज्या भाजपने एकट्याने जिंकल्या आहेत. मी देशातील सर्व भाजप कार्यकर्त्यांना सांगतो, नागरिकांना सांगतो, तुमची मेहनत निरंतर काम करण्याची प्रेरणा देते. आपण सगळे मिळून पुढे जाऊ, देशाला पुढे नेऊ. तिसऱ्या कार्यकाळात देश मोठ्या निर्णयाचा अध्याय रचणार ही मोदींची गॅरेंटी आहे. **(पान २ वर..)**

# मावळमधून खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयाची हॅट्ट्रिक; संजोग वाघेरे पराभूत

**पुणे : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार तथा शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे. त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार व उद्धव ठाकरे गटाचे नेते संजोग वाघेरे-पाटील यांचा ९६ हजार ६१५ मतांनी पराभव केला.

खासदार श्रीरंग बारणे आणि संजोग वाघेरे यांच्यात सरळ लढत झाली होती. मंगळवारी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या फेरीपासूनच बारणे यांनी आघाडी घेतली होती. निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार महायुतीचे बारणे यांना सहा लाख ९२ हजार ८३२, तर 'मविआ'चे पाटील यांना पाच लाख ९६ हजार २१७ एवढी मते मिळाली.

विजय दृष्टिपथात असल्याचा अंदाज आल्यानंतर बारणे हे समर्थकांसह बालेवाडी येथील मतमोजणी केंद्रावर आले. या वेळी त्यांच्या समर्थकांनी जल्लोष करीत घोषणाबाजी केली. महायुतीचा विजय असो, झाली रे झाली हॅट्ट्रिक झाली, घासून नाही ठासून आलो अशा घोषणा समर्थकांनी दिल्या. महायुतीच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी गुलाल उधळत, फटाके वाजवत आनंद व्यक्त केला.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, हॅट्ट्रिक होणार हे मी आधीपासून सांगत होतो. माझ्यावर मतदारांनी विश्वास ठेवून कौल दिला आहे. विरोधकांनी वेगळे चित्र रंगवले. ही निवडणूक नात्या-गोत्याची नव्हे; तर देशहिताची होती. विरोधकांकडे दाखवण्यासाठी काम आणि चेहरा नव्हता. त्यांनी माझ्यावर अनेक आरोप केले, पण त्यांना मतदारांनी त्यांची जागा दाखवली आहे.



### महायुतीचे कार्यकर्ते, नेत्यांना विजयाचे श्रेय!

विजयानंतर खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रतिक्रिया देताना म्हणाले की, मावळच्या जनतेने तिसऱ्यांदा माझ्यावर विश्वास टाकला आहे. मावळमधील सहाही आमदार, कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम केले. त्यांच्या मेहनतीचा हा विजय आहे. दहा वर्षे मतदारसंघात नागरिकांशी एकरूप राहून काम केले. जनतेने माझ्यावर मोठा विश्वास टाकला आहे. त्यांचे आभार मानतो. मतदारांना, महायुतीचे कार्यकर्ते, नेत्यांना विजयाचे श्रेय देतो.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाची जी जी कामे झाली त्या कामांना मतदारांनी पोचपावती दिली. समाज, धर्म यांचे वर्गीकरण करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न काहींनी केला होता, मात्र लोकांनी विकासाच्या कामावरच लक्ष ठेवून मतदान केले. खासदार श्रीरंग बारणे यांचा जनतेशी असलेला संपर्क आणि भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन खूप मेहनत घेतली. त्याबद्दल सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार!**
**-प्रशांत ठाकूर**, आमदार, पनवेल, तथा
मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख, भाजप

# खासदार सुनील तटकरे यांनी रायगडचा गड जिंकला!

## अनंत गीतेंचा पराभव



**अलिबाग : प्रतिनिधी**

महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आपला रायगडचा गड राखला आहे. लोकसभा निवडणुकीत तटकरे यांनी विजय मिळवला. त्यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांचा ८२ हजार ७८४ मतांनी पराभव केला. तटकरे यांना पाच लाख आठ हजार ३५२, तर गीते यांना चार लाख २५ हजार ५६८ मते मिळाली.

रायगड लोकसभा मतदारसंघात ७ मे राजी मतदान पार पडले. यामध्ये १० लाख नऊ हजार ५६३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. या मतदारसंघात १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, पण खरी लढत सुनील तटकरे आणि अनंत गीते यांच्यात होती. ही लढत चुरशीची होणार असा अंदाज व्यक्त केला जात होता, मात्र तसे झाले नाही. सुनील तटकरे यांनी सहज विजय मिळवला तोही २०१९च्या निवडणुकीपेक्षा जास्त मतांनी. २०१९मध्ये तटकरेंनी अनंत गीते यांचा ३१ हजार ४३८ मतांनी पराभव केला होता. या वेळी ८२ हजार ७८४ मतांनी विजय मिळवला. तटकरेंची आघाडी ५१ हजार ३४६ मतांनी वाढली.

अलिबागजवळील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलात मतमोजणी झाली. पहिल्याच फेरीपासून सुनील तटकरे यांनी आघाडी घेतली. ही आघाडी पुढेही सुरूच राहिली.

### 'नोटा' तिसऱ्या क्रमांकावर

रायगड मतदारसंघात सुनील तटकरे व अनंत गीते यांच्यासह १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. वंचित बहुजन आघाडीच्या कुमुदिनी चव्हाण याही निवडणूक लढवत होत्या. त्यांच्यापेक्षा 'नोटा'ला जास्त मते मिळाली. या मतदारसंघात नोटाला तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. चव्हाण यांना १९ हजार ६१८ मते मिळाली, तर २७ हजार २७० मतदारांनी नोटाला पसंती दिली. ११ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली.

### मुस्लीम मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न अयशस्वी

सुनील तटकरे यांना पराभूत करण्यासाठी महाविकास आघाडीने मुस्लीम मतांच्या ध्रुवीकरणाचा प्रयत्न केला, परंतु तो फारसा यशस्वी झाला नाही. मुस्लीम समाजाची मते मिळवण्यातदेखील तटकरे यशस्वी झाले.

### जनतेचे ऋण कधीही विसरणार नाही

महायुतीमधील सर्व घटक पक्ष आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, विकासाच्या मुद्द्यावर लढवलेली निवडणूक याला इथल्या जनतेने साथ दिली. मी रायगड, रत्नागिरीमधील जनतेचे ऋण कधीही विसरणार नाही. महायुतीला कोकणात मोठे यश मिळाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष म्हणून आगामी काळातही काम करणार आहे. केवळ लोकसभेपुरता नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकीतही कोकणातील सर्व जागा जिंकून आणण्याचा निर्धार खासदार सुनील तटकरे यांनी विजयानंतर व्यक्त केला.

# कोकण पट्ट्यात महायुतीला कौल



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

राज्यात कोकण पट्ट्यातील जनतेने महायुतीला साथ दिली आहे. सिंधुदुर्ग-रत्नागिरी, रायगड, ठाणे, कल्याण, पालघर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत.

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे विनायक राऊत पराभूत झाले आहेत. या ठिकाणी भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी विजय खेचून आणला आहे. ते पहिल्यांदाच लोकसभेच्या रिंगणामध्ये होते. रायगडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे विजयी झाले आहेत. त्यांनी ठाकरे गटाचे अनंत गीते यांचा पराभव केला. पालघरमध्ये भाजपचे उमेदवार हेमंत सावरा विजयी झाले असून त्यांनी उद्धव ठाकरे गटाच्या भारती कामठी यांना पराभूत केले. ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नरेश मस्के यांनी ठाकरेंच्या राजन विचार यांचा पराभव केला, तर कल्याणमध्ये मुख्यमंत्र्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटाच्या वैशाली दरेकर यांना पराभूत करीत विजय मिळवला आहे.

मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात ठाकरेंसह महाविकास आघाडीला यश मिळाले असले तरी कोकण हा शिवसेनेचा नेहमीच बालेकिल्ला मानला गेला आहे. याच कोकण पट्ट्यामध्ये महायुतीने बाजी मारली आहे.






# तळकोकणात नारायण राणेंचा बोलबाला

## खासदार विनायक राऊतांविरुद्ध दणदणीत विजय

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून भाजपचे केंद्रीय मंत्री व महायुतीचे उमेदवार नारायण राणे विजयी झाले आहेत. त्यांना ४,४८,५१४ मते मिळाली असून, प्रतिस्पर्धी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विनायक राऊत यांना ४,००,६५६ मते मिळाली. नारायण राणेंनी जवळपास ४७ हजारांहून अधिक मताधिक्क्य घेऊन विनायक राऊतांवर विजय मिळवला आहे.



लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात मतदान झाले. ७ मे रोजी झालेल्या मतदानात ६१.५२ टक्के मतदान झाले होते. या लोकसभा जागेवरून एकूण नऊ उमेदवार रिंगणात होते, परंतु मुख्य लढत भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये होती.रत्नागिरी सिंधुदुर्ग हा पूर्वीपासूनच शिवसेनेचा अभेद्य बालेकिल्ला राहिला आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत विनायक राऊत यांनी महाराष्ट्र स्वाभिमानी पक्षाकडून निवडणूक लढवलेले नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे यांचा १.७८ लाख मतांच्या फरकाने पराभव केला होता. येथे काँग्रेस पक्ष तिसऱ्या क्रमांकावर होता. त्यांना ६३ हजार मते मिळाली होती. २०१४च्या निवडणुकीत निलेश राणे यांनी काँग्रेसकडून निवडणूक लढवली होती, तेव्हा राऊत यांनी त्यांचा १,५०,०५१ मतांनी पराभव केला होता. आता रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी निवडणूक लढवून जिंकवून दाखवली आहे.

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघ २००८ मध्ये परिसीमनानंतर अस्तित्वात आला. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येकी तीन विधानसभा मतदारसंघ त्याचा भाग आहेत. २०१९मध्ये चिपळूणची जागा वगळता उर्वरित पाच जागांपैकी शिवसेनेने चार, तर भाजपने एक जागा जिंकली होती. शिवसेनेतील बंडाचा विनायक राऊत यांना याचा फटका बसला असून, नारायण राणेंनी विजयी होत आपली ताकद दाखवून दिली आहे.

# ठाण्यात मुख्यमंत्रीच 'किंग'; महायुतीचे नरेश म्हस्के विजयी

**नवी मुंबई : बातमीदार**



उत्सुकता लागून राहिलेल्या लोकसभेचा निकाल मंगळवारी लागला. अपेक्षेप्रमाणे ठाणे लोकसभा मतदारसंघात नरेश म्हस्के यांनी आघाडीचे राजन विचारे यांचा तब्बल एक लाख ७५ हजार मतांनी सहज पराभव केला. या विजयाने महायुतीच्या उमेदवारांनी नवी मुंबईत ठिकठिकाणी जल्लोष करीत एकमेकांना मिठाई भरवत आनंद साजरा केला.

एक्झिट पोल प्रदर्शित केल्यापासून निकालाची उत्सुकता बळावली होती. राजन विचारे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यापासून फारकत घेऊन उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहणे पसंत केले होते. शिंदे गटात नवी मुंबई, ठाणे, मिरा भाईंदर येथून मोठा गट सोबत गेल्याने शिंदेगटाची ताकद चांगलीच वाढलेली दिसून आली, तर दुसरीकडे त्यांना भाजपचीही साथ मिळालेली दिसून आले. त्यात विचारे यांचा तोकडा पडत असलेला जनसंपर्क, ठाकरे गटाकडून अंतर्गतरित्या वाढलेली विचारे यांच्याबाबतची नाराजी, प्रभागातील न होणारी कामे या सर्व बाबींमुळे नागरिकांमध्ये निराशा वाढलेली दिसून आली.

दुसरीकडे मुख्यमंत्र्यानी स्वतः प्रतिष्ठेची जागा असल्याने ग्राउंड लेवलवर आपली ताकद लावल्याचे दिसून आले. त्यामुळे अखेर नरेश म्हस्के यांच्या पारड्यात मतदारांनी आपली मते टाकून म्हस्के यांना विजयी केले.

**म्हस्केंची विजयी आघाडी सुरुवातीपासूनच**

पहिल्या फेरीपासून म्हस्के आघाडीवर होते. हळूहळू मतांची आघाडी वाढत म्हस्के यांचा विजय दृष्टिपथात येताच कार्यकर्त्यांकडून विजयोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली. कार्यकर्त्यांनी वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात घोषणा देत जल्लोष साजरा केला.

# 'ससून'मधील डॉक्टरला पैसे पोहचविणारे अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन आरोपीच्या रक्तनमुन्यात बदल केल्याप्रकरणी गुन्हे शाखेने मंगळवारी (दि.४) दोघांना अटक केली. बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवालने आरोपींमार्फत ससूनमधील डॉक्टरला या दोघांनी पैसे पोहचविल्याचे समोर आले आहे. अश्फाक इनामदार (वय ३६, रा. धानोरी, विश्रांतवाडी), अमर गायकवाड (वय २७, रा. सुभाषनगर, नवी खडकी, येरवडा) अशी अटक करण्यात




आलेल्यांची नावे आहेत.

अल्पवयीन मुलाच्या रक्तनमुन्यातील बदल केल्याप्रकरणी यापूर्वी ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक शास्त्र विभागातील डॉ. अजय तावरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांना अटक केली होती. मुलाच्या रक्तनमुन्यात बदल करण्यासाठी अग्रवालने डॉ. तावरे यांना पैसे दिले होते.

तपासात अग्रवालने अश्फाक आणि अमर यांच्याशी संपर्क साधून डॉ. तावरे यांना पैसे दिल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पसार झालेल्या अश्फाक आणि अमर यांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. दोघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना १० जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे.

# अवैध फलकांच्या पाडकामाला सुरुवात

**पनवेल :** पनवेल तालुक्यामधील कोन-सावळा रस्त्यावर २० अवैध फलकांचे पाडकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले आहे. तालुक्यातील कोन-सावळा मार्गावरील फलक पाडण्यासाठी शुक्रवार ते पुढील आठवड्यापर्यंत जोरदार मोहीम राबविली जाणार आहे.

पनवेल तालुक्यामध्ये अनेक रस्त्यांवर अवैध फलक उभारले गेले आहेत. मागील अनेक वर्षे सरकारी जमिनींवर फलक उभारून त्याचे भाडे घेणारी टोळी पनवेलमध्ये सक्रीय आहे. कोन-सावळा रस्त्यालगत २० फलक काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मिलिंद कदम यांनी दोन क्रेन आणि १० मजूर घेऊन पाडकाम सुरू केले. घाटकोपर येथील फलकाच्या दुर्घटनेत अनेकांचा बळी गेल्यावर का होईना मात्र सरकारी यंत्रणा पनवेलमध्ये अवैध फलकांविरोधात जोरदार मोहीम राबवित आहे. कोन-सावळा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने सरकारी जमिनींवर हे अवैध फलक उभारल्याने अनेक वर्षांपासूनचे अवैध फलकांच्या माध्यमातून व्यवसायातून उत्पन्न कमविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पनवेलमध्ये शिवसेनेने केला जल्लोष

**पनवेल : वार्ताहर**

मावळ लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीमध्ये शिवसेना महायुतीचे श्रीरंग बारणे हे तिसऱ्यांदा विजयी झाल्याचे घोषित होताच, पनवेलमधील शिवसैनिकांनी मोठा जल्लोष केला.

फटाक्यांची आतषबाजी, ढोलताशांच्या गजरात पेढे वाटून शिवसैनिकांनी पनवेल शिवसेना कार्यालयासमोर जल्लोष केला व शिवसेना विजयाच्या घोषणा दिल्या. या वेळी शिवसेना महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, पनवेल शहर प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, विभाग प्रमुख अविनाश साफल्य, शाखाप्रमुख किरण कळवेकर, किरण पवार रोहित भोईर युवा सेना विभाग प्रमुख अनिकेत जयस्वाल विभाग प्रमुख रितेश पनवेलकर, राहुल धोत्रे, गुलाब गुलाब बागवान, मंगेश दांडेकर, ओमकार पनवेलकर अभिनय सोमण, मोरेश्वर पाटील, सादिक बागवान व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सांगलीमध्ये मान्सूनपूर्व पावसाची दमदार हजेरी

**सांगली : प्रतिनिधी**

एकीकडे निवडणूक मतमोजणीची धांदल उडाली असताना मंगळवारी (दि.४) सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने सांगली जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी झोडपून काढले. दिवसभराच्या तीव्र उष्म्यानंतर सायंकाळी ३.३० वा.नंतर सुमारे एक तास पावसाने दमदार हजेरी लावली. पावसाने शहरातील रस्ते तर जलमय झाले होतेच, पण ग्रामीण भागात ओढे, नाले यांनाही यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच पाणी आले.

मिरज, सांगलीसह तासगाव, भिलवडी, अंकलखोप, पलूस आदी ठिकाणी दमदार पाऊस झाला आहे. मान्सूनपूर्व पाऊस झाल्याने आता मृग नक्षत्राच्या पेरणीला हा पाऊस पोषक ठरणार आहे. दोन दिवसांत मान्सूनचे आगमन होणार असून त्यानंतर खरीप पेरण्याची धांदल उडणार आहे.

तासगावात दमदार पाऊस झाल्याने खरीपाच्या पेरणीला उपयुक्त ठरणार असून द्राक्ष बागेची काडी तयार होण्यासाठी पाऊस उपयुक्त ठरणार आहे.



# आंब्याच्या कोयी संकलित करण्यासाठी नवी मुंबई पालिकेकडून दोन विशेष वाहने कार्यरत




**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून आंब्याच्या कोयी संकलनाची विशेष मोहीम राबविली जात असून त्या दृष्टीने नियोजन करण्यात आलेले आहे.

नवी मुंबईतील सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॅरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून या आंब्याच्या कोयी संकलित करण्यासाठी दोन परिमंडळांसाठी स्वतंत्र वाहन तयार करण्यात आले असून कोयी संकलन मोहीम व्यापक प्रमाणात राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

महापालिकेच्या फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामवर तसेच व्हॉट्सॲप संदेशांद्वारे नागरिकांकडून या अभिनव उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले असून नागरिक आंब्याच्या कोयी सुकवून विशेष वाहनात देण्यासाठी उत्सुक आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने कोयी संकलनासाठी दोन विशेष वाहने सज्ज करण्यात आली असून प्रत्येक परिमंडळासाठी स्वतंत्र वाहन कार्यरत आहे. परिमंडळ १चे वाहन बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे क्षेत्रातील तसेच परिमंडळ २चे वाहन कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा क्षेत्रातील आंब्याच्या कोयी सोसायट्यांमधून तसेच ज्युस सेंटर्स, रेस्टॉरंट्स व हॉटेल्स अशा ठिकाणांहून संकलित करीत आहेत. या माध्यमातून ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे वर्गीकरण होणाऱ्या कचऱ्यामधील आंब्याच्या कोयींचे स्वतंत्र वर्गीकरण होऊन त्याचा उपयोग पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी होणार आहे.

नागरिकांनी आपल्याकडील आंब्याच्या कोयी पाण्याने धुवून स्वच्छ कराव्यात, उन्हात सुकवाव्यात आणि महानगरपालिकेच्या विशेष वाहनात द्याव्यात आणि पर्यावरण संवर्धनात आपलाही सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# शिक्षक व पदवीधर निवडणूक मतदानाच्या वेळेत वाढ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर आणि कोकण विभाग पदवीधर विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २६ जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही नवीन वेळ निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे उपसचिव व सहमुख्य निवडणूक अधिकारी म. स. पास्कर यांनी दिली.

निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मतदारसंघांकरिता मतदान करण्याची वेळ २६ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत अशी निश्चित करण्यात आली होती, परंतु आता निवडणूक आयोगाने ३ जूनच्या पत्रकान्वये लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५१च्या कलम ५६नुसार पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या मतदानाच्या वेळेमध्ये बदल केलेला आहे. मतदानाची नवीन वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अशी निश्चित करण्यात आली आहे.

विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर व मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी मतदान करावे, या उद्देशाने मतदानाची वेळ वाढवून देण्यात आली असून २६ जून रोजी पदवीधर व शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने आपल्या मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन राज्याचे उपसचिव व सहमुख्य निवडणूक अधिकारी पास्कर यांनी केले आहे.

पान १ वरुन

## तिसऱ्यांदा सरकार स्थापन करणार -पंतप्रधान मोदी

मी सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांचे अभिनंदन करतो. प्रत्येकाच्या सक्रिय सहभागाशिवाय ही निवडणूक प्रक्रिया शक्य नाही. या जनादेशाचे अनेक पैलू आहेत. १९६२नंतर पहिल्यांदाच एखादे सरकार त्यांचा दोन टर्म कार्यकाळ पूर्ण करून तिसऱ्यांदा पुन्हा आले आहे. ज्या ठिकाणी विधानसभेचे निकाल लागले तिथे एनडीएला स्पष्ट विजय मिळाला. आंध्र प्रदेश, ओडिशा, सिक्किम या राज्यात काँग्रेसचा सुपडा साफ झाला आहे. डिपॉझिट वाचवणेही त्यांना कठीण झाले, असा टोला पंतप्रधान मोदींनी लगावला.

ओडिशात लोकसभा निवडणुकीत भाजपने चांगली कामगिरी केली. तिथे भाजपचे सरकार बनणार आहे, पहिल्यांदा भाजपचा मुख्यमंत्री बनणार आहे. भाजपने केरळातही जागा मिळवली. केरळच्या कार्यकर्त्यांनी बलिदान दिलेय. अनेक पिढ्या तिथल्या कार्यकर्त्यांनी संघर्ष केला. ज्या क्षणाची वाट पाहिली आज ते यश मिळाले आहे. तेलंगणात आपली संख्या दुप्पट झाली. मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड, दिल्ली, उत्तराखंड, हिमाचल अशा अनेक राज्यात आपल्या पक्षाने क्लीन स्वीप मिळवले आहे, असेही पंतप्रधान मोदींनी म्हटले.

आंध्र प्रदेशात चंदाबाबू नायडू आणि बिहारमध्ये नीतीश कुमारांच्या नेतृत्वात चांगली कामगिरी केली. १० वर्षांपूर्वी देशात बदल हवा होता म्हणून जनतेने आपल्याला कौल दिला. त्या वेळी देशात नैराश्य होते. अशा वेळी देशाने आपल्याला जबाबदारी दिली होती. आपण पूर्ण प्रामाणिकपणे काम केले. २०१९मध्ये याच प्रयत्नांवर विश्वास ठेवत देशाने पुन्हा दुसऱ्यांदा बहुमत दिले. २०२४मध्ये पुन्हा जो आशीर्वाद एनडीएला मिळाला आहे. त्याबद्दल जनतेसमोर मी विनम्रतेने नतमस्तक आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, आजचा क्षण माझ्यासाठी भावनिक करणारा आहे. माझी आई गेल्यानंतर ही माझी पहिलीच निवडणूक होतीम परंतु देशातील कोट्यवधी माता-भगिनींनी आईची कमी मला भासवून दिले नाही. या आपलेपणाला मी शब्दात मांडू शकत नाही. देशातील माता-भगिनींनी मला नवीन प्रेरणा दिली. मागील १० वर्षात देशाने खूप मोठे निर्णय घेतले. राष्ट्र प्रथमची भावना आम्हाला असामान्य काम करण्याची प्रेरणा देते. जगातील सर्वांत मोठ्या जनकल्याणकारी योजना आम्ही राबवल्या. १२ कोटी जनतेला नल से जल दिले. चार कोटी गरिबांना पक्की घरे दिली. ८० कोटी जनतेला मोफत रेशन दिले. याच भावनेतून जम्मू काश्मीरातून कलम ३७० हटवले. आम्ही राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. कोरोनाचे संकट आले तेव्हा देशहित आणि जनहिताचे निर्णय आम्ही घेतले. आज भारत जगात सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. राष्ट्र प्रथमची भावना भारताला आत्मनिर्भर बनवणार आहे. विकसित भारताचा संकल्प आमचा आहे. १० वर्षांनंतर सलग तिसऱ्यांदा जनतेचा आशीर्वाद आपल्याला ताकद, संकल्पाला नवीन ऊर्जा देतोय.

पंतप्रधान मोदींनी देशाच्या निवडणूक आयोगाचे आभार मानले. जगातील सर्वांत मोठी निवडणूक कुशलतेने पूर्ण केली. ११ लाख मतदान केंद्र, १.५ कोटी निवडणूक कर्मचारी, ५५ लाख ईव्हीएम मशिन, इतक्या उन्हाळ्यातही निवडणूक आयोगाने त्यांची जबाबदारी सांभाळली. भारताची निवडणूक प्रक्रिया, पूर्ण यंत्रणा आणि निवडणूक आयोगाच्या प्रत्येक कामावर भारतीयांना गर्व आहे, असे ते म्हणाले.

# उरणमधील वशेणी, दादर समुद्र किनाऱ्यावर अभ्यासदौरा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील जवळपास पाच हजार लोकवस्तीचे गाव म्हणजे वशेणी गाव. समुद्राचे करंजा बंदरमार्गे पाताळगंगा नदीपर्यंत पाणी घुसते. याच पाताळगंगा खाडीत वशेणी दादर हा समुद्राचा खाडीकिनारा येतो. बदलत्या हवामान व लोकजीवन शैलीचा या खाडीकिनाऱ्यावर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी नुकताच वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा समुद्रकिनाऱ्याचा अभ्यास दौरा झाला.



दौऱ्याची सुरुवात समुद्राबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जलपूजेने करण्यात आली. या वेळी समुद्राला श्रीफळ अर्पण करण्यात आले. त्यानंतर खाडीकिनारा, कांदळवने, खाजणाची जागा, समुद्री जीव यांचे निरीक्षण आणि तौलनिक अभ्यासदेखील करण्यात आला.

कांदळवनाची योग्य देखभाल न झाल्याने खाडीकिनाऱ्यांची मोठ्या प्रमाणात धूप होत आहे. परिणामी बांध फुटून समुद्राचे पाणी शेतात घुसण्याची शक्यता असल्याने उपाययोजना होणे गरजेचे आहे. अभ्यास दौऱ्यात पुरूषोत्तम पाटील, किशोर म्हात्रे, बी.जे.म्हात्रे, हरिश्चंद्र ठाकूर, सतिश पाटील, कैलास पाटील, अनंत पाटील, सुनील तांडेल, हरेश्वर पाटील आदी मंडळाचे सदस्य सहभागी होते.

# तक्का भुयारी मार्ग आजपासून होणार सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधून पनवेल (तक्का)मध्ये जाण्यासाठी रेल्वेने बांधलेल्या भुयारी मार्ग आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या पाठपुराव्यामुळे बुधवारी (दि. ५)पासून सुरू होणार आहे. माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी मंगळवारी सकाळी या ठिकाणी भेट देऊन गटारात माती अडकून भुयारी मार्गात पाणी साचू नये यासाठी तेथे काय उपाययोजना केली आहे त्याची माहिती घेतली.



जेएनपीटी ते वैतरणा सेक्शन फेज -२ या डबल लाईन रेल्वे मार्गाचे काम पनवेल रेल्वे स्टेशन तक्का ते विचुंबे गाव या मार्गावर सुरू असल्याने हा मार्ग बंद करण्यात आला होता. या मार्गामध्ये तांत्रिक चुका झाल्याने पावसात पाणी साचून वाहनचालकांना त्रास होत होता. या मार्गाच्या दोन्ही बाजूला ब्लॉक संपतात त्या ठिकाणी मार्गातील पाणी जाण्यासाठी गटार ठेवण्यात आले आहे. या गटाराची ऊंची ही आतील सिमेंट ब्लॉकपेक्षा जास्त असल्याने आतमध्ये साठलेले पाणी तसेच राहत होते. याशिवाय त्याठिकाणी वाहून येणारी माती नदीच्या पात्रात न जाता तेथील दुभाजकाजवळील जाळीला अडकून राहून गटार मातीने भरून जाते. त्यामुळे वरून येणारे पाणी नवीन पनवेलकडे येण्याचा मार्ग असलेल्या ब्लॉकमध्ये जाते तेथून पाण्याचा निचरा होण्यासाठी दूसरा मार्ग नसल्याने वाहन चालकांना या पाण्यातून गाडी न्यावी लागते आतमध्ये शेवाळ झाल्याने दुचाकी वाहने घसरून अपघात होतात.

माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांनी २४ मे रोजी या ठिकाणी भेट दिली होती. या वेळी त्यांच्यासोबत समीर मोरे, पंकज अष्टीवकर, अनिकेत खुटकर व रेल्वेचे ठेकेदार उपस्थित होते. गटारात माती अडकून भुयारी मार्गात पाणी साचू नये यासाठी तेथे काय उपाययोजना करता येईल व भुयारी मार्गात दिवे बसवणे याबाबत चर्चा करून ५ जूनपूर्वी ते काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बुधवारी हा मार्ग सुरू होणार असल्याने मंगळवारी त्यांनी रेल्वेने त्या ठिकाणी केलेल्या उपाययोजनांची पाहणी केली.

**जेएनपीटी ते वैतरणा सेक्शन फेज -२ या डबल लाईन रेल्वे मार्गाचे काम पनवेल रेल्वे स्टेशन तक्का ते विचुंबे गाव या मार्गावर सुरू असल्याने हा मार्ग बंद केला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या पाठपुराव्यामुळे ५ जूनपासून मार्ग सुरू होणार आहे. मार्गातील तांत्रिक अडचणी दूर करण्या बद्दल रेल्वेचे इंजिनियर आणि ठेकेदार यांच्याशी चर्चा केली होती. भुयारी मार्गात पाणी साठू नये यासाठी गटारात अडकणारा गाळ साफ करता येण्यासाठी गटारावरील जाळी काढता येण्याची सोय केली आहे. भुयारी मार्गात दिवे बसवण्याचे काम सुरू आहे.**

**-तेजस कांडपिळे,** माजी नगरसेवक

# सुरक्षारक्षकानेच केली घरफोडी; ऐवज चोरला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या तक्का भागात राहणाऱ्या डॉक्टरच्या घरामध्ये कामासाठी ठेवण्यात आलेल्या नेपाळी सुरक्षारक्षकाने तीन साथीदारांसह डॉक्टरचे घर फोडून त्यांच्या घरातून रोख रक्कम, दागिने असा तब्बल ६० लाख ८८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणातील नेपाळी चौकडीविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.



या प्रकरणातील तक्रारदार डॉ. मनोज कांतीलाल जैन (५०) हे पनवेलच्या तक्का भागात कुटुंबीयांसह राहण्यास आहेत. डॉ. जैन यांनी घरामध्ये काम करण्यासाठी तसेच इमारतीवर सुरक्षारक्षक म्हणून समीर या नेपाळी व्यक्तीला कामाला ठेवले होते. त्याचप्रमाणे कृष्णा नामक दुसऱ्या नेपाळी व्यक्तीला वडिलांच्या कपड्यांच्या दुकानात कामाला ठेवले होते.

गेल्या रविवारी डॉ. जैन हे कुटुंबीयांसोबत महाबळेश्वर येथे फिरण्यासाठी गेले होते. तेव्हार समीर, कृष्णा व त्यांचे इतर दोन साथीदार अशा चौघांनी सोमवारी पहाटेच्या सुमारास डॉ. जैन यांचे घर फोडले.

सकाळी सव्वापाच वाजण्याच्या सुमारास त्याच इमारतीत राहणारे डॉ. जैन यांच्या भावाला डॉक्टरांचे घर उघडे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी आतमध्ये जाऊन पाहणी केल्यानंतर घरामध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच डॉ. जैन तातडीने पनवेलमध्ये परतले. पनवेल शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्हीची पाहणी केली असता, ही घरफोडी ही नेपाळी सुरक्षारक्षक व त्याच्या साथीदारांनी केल्याचे निदर्शनास आले आहे.

## पनवेल परिसरात मान्सूनपूर्व सरींनंतर उकाड्यात वाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरात सोमवारी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. यामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला, मात्र मंगळवारी उकाड्यात वाढ झालेली जाणवली.

उष्णतेच्या काहिलीमध्ये सुरू झालेल्या पावसाचे पनवेलकरांनी स्वागत केले. अचानक आलेल्या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली. या बदलेल्या वातावरणामुळे तात्पुरते समाधान मिळाले, मात्र काही क्षणातच पुन्हा एकदा उकाड्याला सुरुवात झाली आहे.



उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, सुजाता पाटील, पी.ए. कोळी, भार्गव ठाकूर, विनायक कोळी, ऋषी ठाकूर, राजकिरण कोळी आदी उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य, विज्ञान विभागातील पहिल्या तीन टॉपर्सचा व त्यांच्या पालकांचा सन्मान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

कला विभागातून प्रथम लबडे प्रचिती योगेश ८२.१७ टक्के, द्वितीय धुरी परिणीता प्रमोद ८१.५० टक्के, तृतीय बांगरी अश्विनी रवी ७६.८३ टक्के, वाणिज्य विभागातून प्रथम देसाई यश अजित ९२.६७ टक्के, द्वितीय घरत श्रेया संतोष ९०.३३ टक्के, तृतीय पाटील प्राची ज्ञानेश्वर ८९.३३ टक्के, विज्ञान विभागातून प्रथम गुप्ता आरती मोहनलाल ८९.५० टक्के, द्वितीय मोरे धनराज सुधाकर ८८.५० टक्के, तृतीय गुप्ता आशिष पप्पू ८७.६७ टक्के यांना सन्मानित करण्यात आले.

या वेळी उच्च माध्यमिक विद्यालयातील गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



उलवे नोड : मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार तथा शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली आहे. या विजयाबद्दल सेक्टर १९ येथील भाजप कार्यालयासमोर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

## निवडक

### पार्किंग परिसरात मृतदेह आढळला

**पनवेल :** रेल्वे स्टेशन पार्किंगच्या बाहेर मोकळ्या जागेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६० वर्षे, डोक्याचे केस काळे पांढरे, दाढी मिशी वाढलेली व पांढरी, बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट असून अंगात पांढरा फुल बाह्याचा शर्ट व लाल चौकडीची लुंगी घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश खरात यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कळंबोलीत एकावर चाकूहल्ला

**पनवेल :** अमली पदार्थांची विक्री करत असल्याची पोलिसांना खबर देणाऱ्या भंगार विक्रेत्यावर व त्याच्या सहकाऱ्यावर एकाने चाकू आणि ऑईस टोच्याने हल्ला केल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे. मोहम्मद चौधरी (वय ४८) असे या आरोपीचे नाव असून त्याने इम्रान मोहम्मद हसन शेख (वय ३८) हा भंगार वेचण्याचा व्यवसाय करतो, तर मोहम्मद चौधरी हा अंमली पदार्थ विक्री करत असून त्याची माहिती इम्रान याने पोलिसांना दिली होती. त्यामुळे पोलिसांनी मोहम्मदवर कारवाई केली होती. याचा राग चौधरी याने मनात धरून इम्रान हा दुचाकीवरुन गंगासिंह याच्यासोबत चालला असताना त्याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. यात तो जखमी झाला आहे तसेच त्याचा सहकारीसुद्धा जखमी झाला आहे. या घटनेची नोंद कळंबेली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरणमध्ये विजेचा खेळखंडोबा

## पावसाळा सुरू होण्याआधीच पूर्व भाग अंधारात

**उरण : वार्ताहर**

उष्म्याचे प्रमाण प्रचंड वाढले असल्याने आणि उरणच्या पुर्व विभागात महावितरणची वीज केव्हाही आणि कितीही वेळा खंडीत होत असल्याने नागरीकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. रविवारी पूर्व भागातील वीज रात्रभर गायब होती. त्यामुळे पूर्व भागातील जनतेला गर्मीत रात्र जागवावी लागली.

उरण तालुक्यातील पुर्व भाग विकसित होत चालला आहे विविध कंपन्याची गोदामे वसली आहेत. विजेचा वापरात ही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विजेचा वापर वाढत असताना मात्र सर्व सामान्य जनतेची दररोजची वीज गायब होऊ लागली आहे. कोणत्याना कोणत्या भागामध्ये विजेचे फॉल्ट असल्याचे कारण पुढे करत वीज गायब होते. गेल्या वीस दिवसांपासुन हा नित्य नियम सुरू आहे.

उरण पुर्व भागात या वीज वाहिन्यांच्या खाली सर्वत्र भराव झाल्यामुळे वीज वाहिन्या जमिनीलगत खाली आल्या आहेत. एखादे वाहन किंवा काहीतरी अपघात होवून या वीज वाहिन्या तुटल्या जातात त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होतो. त्याच प्रमाणे पूर्व उरणच्या काही भागाला खोपटे पुलावरून वीज जोडली आहे, मात्र या केबलमध्येही नेहमी समस्या उद्भवत असतात आणि भेंडखळ खाडीत नेहमी वीज वाहिन्या आणि पोल तुटण्याचे प्रकार घडत असतात. भेंडखळ खाडीत दलदल आणि पाणी असल्यामुळे येथे दुरूस्ती करण्यास वेळ लागतो.

उरण तालुक्यात मागील काही वर्षात वीजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तालुक्यात सुमारे ७० हजार वीज ग्राहक आहेत. यामध्ये ७०० ते८०० हे व्यावसायिक प्रकारचे ग्राहक आहेत. तालुक्यात सुमारे ५००च्या जवळपास ट्रान्सफार्मर आहेत. उरण पूर्व भागात सुमारे ७० ते ७५ किलोमीटर लांबून वीज आणावी लागते. त्यामुळे येथ पर्यंत येताना वीज वाहिनीमध्ये काहीतरी समस्या येऊन रोज वीज खंडीत होते. यासाठी हे अंतर कमी करणे गरजेचे आहे. यासाठी उरण पूर्व भागात सबस्टेशन आणि फिडर उभारणे गरजेचे आहे. उरण पुर्व भागात दिघोडे येथे सबस्टेशनला जागा निवडण्यात आली असून येथे सबस्टेशन झाल्यास उरण पूर्व भागातील वीज समस्या सुटेल.


**उरण पूर्व भागाला ज्या ठिकाणाहून वीज दिली आहे त्या भेंडखळ खाडीत वीज वाहिन्या तुटल्या होत्या आणि केबल मध्ये समस्या उदभवली होती त्यामुळे रविवारी रात्रभर या भागातील वीज पुरवठा खंडीत झाला होता. महावितरण कर्मचारी आणि अधिकारी यांनी पहाटे पाच वाजेपर्यंत दुरूस्ती करून वीजपुरवठा पुर्ववत केला. भेंडखळ खाडीतील वीज वाहिन्या बाहेर काढण्याचे नवीन काम मंजूर झाले असून येत्या काही दिवसांत हे पुर्ण करण्यात येईल आणि वीज जाण्याची समस्या दूर होईल.**

**-विजय सोनावले,** अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, उरण

# कामोठे येथे शनिवारी मोफत आरोग्य शिबिर

**पनवेल :** छाबा फाउंडेशन ट्रस्ट व सिमीरा डायग्नोस्टिकतर्फे पनवेल महापालिकेचे माजी सभापती विकास घरत यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. ८) मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात मधुमेह चाचणी, रक्तदाब चाचणी, थायरॉईड चाचणी, कॉलेस्ट्रॉल चाचणी करण्यात येणार आहे. शिबिर सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत कामोठे सेक्टर ३४ येथील श्री कृष्ण बालाजी सोसायटीमधील यू अँड लाईफ सायन्स येथे होणार आहे. यासाठी संपर्क ९६१९४५२४४७/७५०६७५०३११ येथे साधावा, असे आवाहन आयोजक छाबा फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष दामोदर बाजीराव चव्हाण यांनी केले आहे.

अपने मन में एक लक्ष्य लिए
मंज़िल अपनी प्रत्यक्ष लिए
हम तोड़ रहे हैं जंजीरें
हम बदल रहे हैं तस्वीरें
ये नवयुग है, नव भारत है
खुद लिखेंगे अपनी तकदीरें
हम निकल पड़े हैं प्रण करके
अपना तन-मन अर्पण करके
जिद है एक सूर्य उगाना है
अम्बर से ऊँचा जाना है
एक भारत नया बनाना है
एक भारत नया बनाना है
-नरेंद्र मोदी, पंतप्रधान





उरण : जासई येथील भाजप महिला मोर्चा तालुका उपाध्यक्ष अरुणा घरत यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुकाध्यक्ष रवी भोईर, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, जासई विभाग महिला अध्यक्ष शमीता ठाकूर, आवरे पंचायत गण अध्यक्ष अजित पाटील, दिघाटीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमित पाटील, पिरकोनचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य के.वाय. गावंड, शिक्षण संघटक अजित जोशी, मनसे संघटक नितीन म्हात्रे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# मोदी सरकारची हॅटट्रिक..!

चारशे खासदारांच्या फौजेनिशी मोदी सरकार पुन्हा एकदा आले तर आपले काही खरे नाही, या भीतीपोटी विरोधकांनी कधी नव्हे ती एकजूट दाखवत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीशी दोन हात केले. त्यामुळे काँग्रेसच्याही कामगिरीत लक्षणीय सुधारणा झाली, पण याचा अर्थ लोकांचा मोदी सरकारवरील विश्वास कमी झाला असा मात्र होत नाही. आजही सर्वांत मोठा पक्ष भाजपच आहे आणि भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचेच सत्तेवर वर्चस्व आहे हे मान्य करावेच लागेल.

**देशाच्या जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरच विश्वास दाखवला आहे. गेले दोन महिने गाजत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीचे निकाल मंगळवारी संध्याकाळपर्यंत बव्हंशी जाहीर झाले होते. त्यानुसार जवळपास तीनशे जागांचा आशीर्वाद जनतेने पंतप्रधान मोदी यांच्याच पदरात घातला. अर्थात हा निकाल तसा अपेक्षितच होता. 'अबकी बार चारसौपार' अशी घोषणा भारतीय जनता पक्षाने दिल्यानंतर विरोधकांच्या तोंडचे पाणी पळाले होते. आता भाजप आणि 'रालोआ'ला 'चारशेपार'चे लक्ष्य गाठता आले नाही म्हणून यातले काही जण दिवाळी साजरी करत आहेत, परंतु राजकीय परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही, किंबहुना भारतीय मतदारांनी तो पडू दिलेला नाही, हे लक्षात घ्यायला हवे. पंतप्रधान मोदी यांना मतदारांच्या निर्विवाद पाठबळाची जाणीव होती, म्हणूनच वाराणसीत, त्यांच्या मतदारसंघात मतदान चालू होते, तेव्हा ते ध्यानधारणेत मग्न राहिले. विजयाची जणू त्यांना खात्रीच होती. गेली दहा वर्षे पंतप्रधान मोदी यांनी समर्थपणे देशाला विकासाच्या मार्गावर दौडविले आहे. त्यांच्या कठोर परंतु अत्यावश्यक निर्णयांचा थेट लाभ जनतेला झाला. भारतीय अर्थव्यवस्था २०१४ पूर्वी कुठल्या अवस्थेत होती आणि आता ती कुठे पोहचली आहे हे आकडेवारीच सांगते. यंदाच्या निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपला फटका बसला हे उघड आहे. तसे नेमके का घडले याचे विश्लेषण होईलच. महाराष्ट्रात महाविकास आघाडीने चांगले यश प्राप्त केलेले दिसते. गेल्या तीन-चार वर्षांत महाराष्ट्रात विश्वासघाताचे जे राजकारण घडले, त्यामुळे अशा प्रकारचा निकाल दिसतो आहे. पुढील राजकीय घडामोडींमुळे दोन राजकीय पक्ष फुटले आणि राजकारणाची खिचडीच झाली. त्याचा परिणाम राज्यातील मतदानावर झालेला दिसला. असे असले तरी भाजपने आंध्र प्रदेश आणि ओडिशामध्ये कमाल केली. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात झालेले नुकसान या दोन राज्यांमध्ये भरून निघाले. २०१९ साली भाजप आणि रालोआ यांना जेवढ्या जागा मिळाल्या होत्या, त्यात विशेष हानी झालेली नाही. आजही भाजपप्रणित आघाडी तीनशेच्या घरातलीच आहे, त्यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकारच सत्तेवर येणार, हे नक्की आहे. एग्झिट पोलच्या पाहण्यांनी वेगवेगळे कौल दिले होते. त्यापैकी एकही अंदाज वास्तवाच्या जवळ जाणारा ठरला नाही. एग्झिट पोलच्या पाहणीमुळे केवळ अंदाज सांगता येतो. पुन्हा एकदा मोदी सरकार सत्तेवर येणार, हे तरी या पाहण्यांनी स्पष्ट केले होते. तो अंदाज सोडला तर त्यांचे बाकीचे सगळेच अंदाज कोसळले असे म्हणावे लागेल. या निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभव पत्करावा लागला. तो अनपेक्षित वाटत असला तरी स्थानिक राजकारणाचे काही परिणाम असेही दिसू शकतात. भाजपचे सुधीर मुनगंटीवार यांचा पराभव असाच मन खट्टू करणारा आहे. काही महत्त्वाचे उमेदवार सोडता, बाकी भाजपच्या सर्वच उमेदवारांनी चांगली कामगिरी नोंदवली आहे, यात शंका नाही.**

# निसर्गाचे संतुलन... काळाची गरज

आहाहा... काय हा उन्हाळा, किती असहय होतयं, किती ही उष्णता... अंगावर कापडे ठेवावीसी वाटत नाही. अंगाची अगदी लाही लाही होते त्यात हवा नाही, समोर झाडाचं पान हालत नाही.. हवा नसल्याने आणखीनच गरम. कसं सहन करायचं..परवा भाच्याच्या लग्नानिमित्त गावी जाण्याचा योग आला, अर्थात लग्न खेडयातच होतं, लग्नाची वेळ दुपारी १२ वा. ३९ मिनीटांची, विचार करा काय परिस्थिती असेल. एका छोटयाश्या मैदानात लग्न मंडप टाकला होता. वरती पातळ कापडाचा पडदा बांबूच्या आधाराने बांधला होता. अशा मंडपात वऱ्हाडी मंडळी, पाहुणे मंडळी बसली होती. बिचारा नवरदेव एका गाडीत बसलेला, वरून पत्रा तापलेला, त्यात अंगावर नवीन कापडं, सुट, मग काय उकाड्याने नवरदेव हैराण, घामाच्या धारा अंगातून वाहत होत्या. नवरी मुलीचीही हिच गत होती. सोबतच्या करवल्यांच्या गर्दीने तीचा जिव मेटाकुटीस आला होता.



लग्न लागलं, नवरा-नवरीच्या डोक्यावर अक्षता पडल्या. सकाळपासून उपाशी असलेली पाहूणे मंडळी एकदाची जेवायला बसली. पोठभर जेवून पंगती उठल्या, लग्नातील इतर विधी उरकून घेतले. यावरून मला आपणांस असे सूचवावेसे वाटते की, निसर्गाचा समतोल ढळत चालला आहे वेळी अवेळी पाऊस पडतो, अल निनो सारखी वादळं येत आहेत. वादळामुळे खुप मोठ्या प्रमाणात जिवितहानी, आर्थिक नुकसान, शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान, घरावरील पत्रे उडणे, झाडे उन्मळून पडणे, अचानक कुठेतरी विज पडणे त्यामुळे अनेकांचे बळी गेले आहेत तसेच जनावरं मृत्यूमुखी पडले आहेत.

अचानक आलेल्या पावसामुळे अतोनात नुकासान झाले आहे. मोठमोठया दरडी कोसळुन त्यात गावंच्या गावं गडब झाली आहेत. पुणे जिल्ह्यातील माळींन हे गाव, रायगड जिल्हातील तळीये, महाड यासारखी दुर्घटना तसेच नदीला पुर येवून अनेक ठिकाणी माणसं व जनावरे वाहून गेल्याची उदाहरणे आहेत. हे आपण मागील अनेक वर्षापासून पाहत आलो आहोत, अनुभवत आहोत. बरं यात सरकारी यंत्रणा कितीसी पुरी पडणार? त्यासाठी आपणास स्थानिकांच्या मदतीनेच उपाययोजना करावी लागते हे विसरून चालणार नाही.

खरं तर हे कशामुळे व कुणामुळे होत आहे हे आपण शोधून काढले पाहिजे. अं हं जास्त डोकं चालवायची किंवा लढवायची गरज नाही. वरील या सर्व बाबींला आपणच जबाबदार आहोत. लागला ना जोराचा झटका! होय याला कारणीभूत आपणच आहोत. सुख उपभोगण्यासाठी व चैनीसाठी चकचकित घरं, इमारती, रस्ते, विहिरी, तलाव वगैरेसाठी भरपूर प्रमाणात सिमेंट रेतीचा वापर केला जातो, त्यामुळे जागो जागी सिमेंटचे जंगल उभारल्याचे चित्र दिसत आहे. शेतीत लावलेल्या बागायतीसाठी पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हावे म्हणून शेतकरी शेतात ५०० ते १००० फुट बोरवेल (कुपनलिका) यंत्राच्या सहाय्याने खोल घालत आहे. सगळीकडे हिच परिस्थिती उद्भवल्याने भुगर्भतील पाण्याची पातळी खोलवर जावून जमीनीतील पाणी आटत चालले आहे. ज्या प्रमाणे बाळाने आईचे दुध पिण्यासाठी रक्त येईपर्यंत स्तन ओढावे असा काहींसा प्रकार होत चालला आहे. शिवरात झाडे नाहीत, मनुष्य स्वतःच्या स्वार्थासाठी व चार पैश्यांच्या आशेपायी बेसुमार वृक्ष तोड करित आहे, जिकडे पहावे तिकडे दुरवर झाडाची सावली दिसत नाही.

शेतीतील पिकांचे भरपूर प्रमाण उत्पादन व्हावे म्हणून आपण जास्त प्रमाणात वेगवेगळ्या रासायनिक खतांचा वापर करीत आहोत. पिकांवरील किटक नाशंकांसाठी विषारी औषधांची फवारणी करीत आहोत, सेंद्रिय खताचा वापर कमी झाला आहे. आधुनिक शेतीच्या नावाखाली बैलांची कामे ट्रॅक्टर करीत आहे त्यामुळे जमिनीवर पडणारे शेण, मल-मुत्र नाहिसे झाले आहे. बैल, जनावरे यांची निगा राखता येत नाही म्हणून शेतकऱ्यांने जनावरे विकून टाकली आहेत. सेंद्रिय खत नसल्याने व रासायनीक खत, औषधे फवारल्याने जमिनीचा पोत कमी झाला आहे. पुर्वीसारखी जमिन पिकत नाही त्याला हे एक कारण आहे. त्यामुळे येणाऱ्या पुढील काळात खुप भयावह परिस्थितीला तोंड द्यावे लागणार यात तिळमात्र शंखा नाही.

आपल्या भारतास ३३ टक्के ग्रीन झोन म्हणून जाहिर केले आहे, परंतु वरील परिस्थिती उद्भल्यामुळे त्याची पातळी ३३ टक्क्यांवरून २४ टक्क्यापर्यंत खाली आली आहे. हिच जर परिस्थिती राहिली तर वरील टक्केवारी अजून कमी व्हायला वेळ लागणार नाही. यावर्षी दरवर्षीपेक्षा तापमान जास्त आहे. ४२ अंश से. ते ४८ अंश से. पर्यंत तापमान वाढत आहे. ही संपूर्ण जिव सृष्टीला व मानव जातीला धोक्याची सुचना आहे.

पुढे अशी परिस्थिती उद्भवेल म्हणून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी काय करता येईल. यासाठी सन १९७२ला स्विडन येथे स्टॉकहोम या शहरात संयुक्त राष्ट्राने जागतिक परिषद घेतली. परिषदेत पर्यावरणाचा संपूर्ण आढावा घेण्यात आला. या परिषदेसाठी भारताकडून त्यावेळच्या पंतप्रधान आरणीय इंदिरा गांधी यांनी नेतृत्व केले होते. त्यावेळी सर्व राष्ट्रांच्या अनुमतीने ५ जून हा विश्व पर्यावरण दिवस (जागतिक पर्यावरण दिवस) साजरा करावा असे ठरले. त्यानुसार सन १९७४ पासून ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यास सुरूवात झाली. या दिवशी अनेक सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, कारखाने, महापालिका या ठिकाणी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. त्यात प्रदुषण नियंत्रणा विषयी व्याख्याने, प्रदुषित पाणी, हवा यांच्या शुध्दीकरणासाठी काय करण्यात येईल याची माहिती तांत्रिक अभ्यासकाकडून दिली जाते. तसेच अनेक ठिकाणी वृक्षारोपणाचे कार्यक्रम घेतले जातात. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण केले जाते. अनेक संस्थांकडून व्याख्यानाच्या माध्यमातून, सांस्कृतिक कार्यक्रमातून जनजागृती केली जाते, भिंतीवर पर्यावरण नियंत्रणाचे घोषवाक्य लिहिले जातात परंतु हे सर्व माझ्या मते तेवढयापूरतेच पुन्हा येरे माझ्या मागल्या... तेव्हां हे सर्व पाहता आपणांस विनंतीपूर्वक सांगू इच्छितो की, आपण जमेल तसे, जास्तित जास्त प्रमाणात वृक्षारोपण करावे व संवर्धन करावे. 'झाडे लावा, झाडे जगवा' भले ते आपल्या शेतात, परस बागेत, रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी, नदी-नाल्याच्या कडेने जास्तित जास्त प्रमाणात झाडे लावा. नुसती लावून भागणार नाही तर त्याचे संगोपन करा. उन्हाळ्यात पाणी द्या.

ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या माध्यमातून पाण्याची व्यवस्था करा. येणाऱ्या पुढील काळात याची खुप गरज आहे. सध्या जे उष्णतामान वाढले आहे, ते कमी करण्यासाठी आपण सर्वांनी या महान कार्यात सहभागी होऊया! तरच आपले पुढचे दिवस सुखाचे व थंडाव्याचे जातील नाहीतर मणूष्य प्राणी जाग्यावर करपून निघाल्याशिवाय राहणार नाही.


आपणांस माहितीसाठी कळवू इच्छितो, जळगाव जि. प. प्रशाळेचे शिक्षक विश्वास बडगुजर व त्यांच्या पत्नी विद्या बडगुजर या दाम्पत्यांनी नैसर्गिक वृक्षारोपण कसं करावं हे सुचवले आहे कोणत्याही काटेरी झाडाखाली किंवा काटेरी झुडपात थोडासा खड्डा करून त्यात कोणतेही बी टाका उदा. आंबा, जांभळ, सिताफळ, चिंच, कडुलिंब इ. चे बी त्या खड्डयात टाकून, वरती माती टाकून तो खड्डा बुजवा. पुढे काहीही करू नका... पावसाच्या पाण्यावर ते झाड येईल, ते काटेरी झुडपात असल्यामुळे त्याला बकरी, शेळया वगैरे अन्य प्राणी खाणार नाहीत. आईच्या कुशीत जसं बाळ सुरक्षित राहतं, तसंच ते झाड त्या काटेरी झुडपात सुरक्षित राहतं. व ते १०० टक्के जगतं व त्याची वाढ होते.

तेव्हा आजच आपण शपथ घेवू या 'वृक्ष लावून जगवणे हे माझे नैतिक कर्तव्य आहे, आणि ते मी करणारचं' आपल्या या उपक्रमामुळे येणाऱ्या पुढच्या वर्षी हि सृष्टी बऱ्याच प्रमाणात हिरवी गार दिसेल, पक्षी आनंदाने विहार करतील, नद्या पाण्याने तुडुंब वाहतील, तलाव भरलेले दिसतील, सर्वांना पिण्यासाठी व शेतीसाठी मुबलक पाणी मिळेल व वातावरणात थंडावा राहिल. मग अजुन काय हवं! कराल ना एवढं?

**-शिवाजी मोटे, ज्येष्ठ साहित्यिक, खारघर**

## बदलते तंत्रज्ञान

### खराब फोन सॅमसंग वर्षातून दोनदा विनाखर्च दुरूस्त करून देणार



सॅमसंगने सोमवारी एक मोठी घोषणा केली, आता वापरकर्ते त्यांचे खराब झालेले स्मार्टफोन, टॅब्लेट, स्मार्टवॉच वर्षातून दोनदा कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय दुरुस्त करून घेऊ शकतील.

सॅमसंग वापरकर्त्यांसाठी आनंदाची बातमी आहे. कंपनीने आपल्या ग्राहकांसाठी मोठी घोषणा केली आहे. उकरणाच्या संरक्षणासाठी, कंपनीकडे आधीपासूनच Samsung Care+ प्रोग्राम आहे, जो कंपनीने आता विनामूल्य अपग्रेड केला आहे. या अपग्रेड अंतर्गत, वापरकर्ते त्यांचे डिव्हाइस वर्षातून दोनदा दुरुस्त करू शकतील. या दोन दाव्यांच्या दरम्यान, वापरकर्ते स्क्रीन संरक्षण आणि लिक्विड डॅमेज संरक्षणाचा लाभ घेऊ शकतात. Samsung Care+ hm Galaxy उपकरणांसाठी एक स्किम आहे.

यामध्ये वापरकर्त्यांना कोणत्याही घसाराशिवाय १००% सुरक्षा मिळते. वापरकर्त्यांना वॉक-इन आणि पिक-अपची सुविधा मिळते. येथे, ग्राहक त्यांच्या सोयीनुसार कोणताही पर्याय निवडू शकतात आणि त्यांच्या डिव्हाइसची दुरुस्ती करू शकतात. येथे तुम्ही वेळेचे वेळापत्रक इत्यादी देखील करू शकता.

Samsung Care+ बाबत, कंपनीचा दावा आहे की, सॅमसंग उत्पादनांच्या दुरुस्तीसाठी अस्सल भाग वापरण्यात आले आहेत. तसेच, डिव्हाइसच्या कार्यक्षमतेसह कोणत्याही प्रकारची तडजोड केली जात नाही. याच्या मदतीने तुमचे उपकरण अगदी नवीन उपकरणाप्रमाणे काम करेल.

Samsung Care+ प्लॅनची सुरुवातीची किंमत ३९९ रुपये आहे, जी संपूर्ण Galaxy श्रेणी कव्हर करते. यामध्ये Galaxy Smartphone, Galaxy Tablet, Galaxy Watch, Galaxy Book यांचा समावेश आहे. तसेच, Samsung Care+ मध्ये दावा कोणत्याही अडचणीशिवाय उपलब्ध आहे, जो शून्य दस्तऐवजांवर आधारित आहे.

या कालावधीत, वापरकर्त्यांचा डेटा गोपनीयता पूर्णपणे सुरक्षित असेल. यासह, ग्राहकाला हवे असल्यास, तो दुरुस्ती प्रक्रियेची माहिती घेऊ शकतो, यासाठी एक साधी प्रक्रिया करावी लागेल. डिव्हाइस खरेदी करताना Samsung Care+ योजना खरेदी करावी लागेल.

# साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे

प्रख्यात महाराष्ट्रीय हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिव टेंबे यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे, जि. कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली.

गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते; मात्र स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.

अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी पट-वर्धन (१९२४), तुलसीदास (१९२८), वत्सलाहरण (१९२९), वरवंचना (शेरिडनच्या ड्यूएन्नाचे रूपांतर, १९२५), गंभीर घटना (ऑस्कर वाईल्डच्या इंपॉर्टन्स ऑफ बीइंग अर्नेस्टचे रूपांतर, १९३२), तारकाराणी, देवी कामाक्षी, मत्स्यभेद इ. नाटके लिहिली. तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९ मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.



## निमित्त

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंतःकरणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. संगीतातील काही बाळबोध प्रकारांवर (उदा., साकी, दिंडी यांसारखी वृत्ते, कीर्तनकारांची पदे इ.) आधारलेल्या किर्लोस्करी नाट्यसंगीताला अभिजात हिंदुस्थानी संगीताचा तसेच वेधक कर्नाटकी चालींचा नवीन साज चढविण्यात व संगीताला नाटकात अग्रेसर स्थान प्राप्त करून देण्यात टेंबे यांचा वाटा फार मोठा आहे. या दृष्टीने मानापमान व विद्याहरण या नाटकांतील चाली उल्लेखनीय आहेत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली. या लक्षणगीतांची ध्वनिमुद्रिकाही नंतर प्रकाशित करण्यात आली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. वरील ग्रंथांमध्ये प्रामुख्याने चरित्रपर वर्णने आहेत. संगीतावर आत्मप्रत्ययपूर्वक रसाळ व आस्वाद्य लेखन करणाऱ्या लेखकांत त्यांचे स्थान अग्रगण्य मानले जाते. नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, संगीतक्षेत्रातील पहिले सौंदर्यमीमांसक, संगीतिकांचे पहिले प्रवर्तक वगैरे अनेक क्षेत्रांत ते पहिले म्हणून गाजले. भारत नाट्य संमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. तेथे कला सादर करणाऱ्या होतकरू कलाकारांना त्यांचे प्रोत्साहनपर मार्गदर्शन असे. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ' गोविंदराव टेंबे रंगमंदिर' उभारण्यात आलेले आहे.

गोविंदरावांचा विवाह लक्ष्मी यांच्याशी झाला. त्यांना रघुनाथ, गणेश व माधव हे तीन पुत्र. माधव टेंबे हेदेखील संवादिनी वाजवीत असत. गोविंदरावांचे दिल्ली येथे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : खासगी शाळा सुरू झाल्या असल्या तरी शासकीय शाळा सुरू होण्यास पुढील आठवडा उजाडणार आहे. त्यामुळे सायंकाळी उद्यानांमध्ये बच्चेकंपनीची गर्दी दिसून येते.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

### मिठाच्या सेवनाबाबत आरोग्य संघटनेचा इशारा

जागतिक आरोग्य संघटनेने मीठाच्या सेवनाबाबतचा मोठा इशारा दिला आहे. अत्याधिक प्रमाणात मीठ खाणाऱ्यांना हृदयाशी संबंधित आजार होऊ शकतो, हे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मृत्यूही ओढवू शकतो, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. मिठाचं सेवन किती प्रमाणात करावे, याची मानकेही आरोग्य संघटनेने ठरवली असून नागरिकांना मीठ कमी प्रमाणातच खाण्याचे आवाहनही केले आहे.



मिठाचं प्रमाणापेक्षा अधिक सेवन केल्याने हे मृत्यू होत आहे. मिठाच्या सेवनाचे प्रमाण कमी केल्यास हा आकडा कमी होऊ शकतो. मिठाचे सेवन किमान २५ टक्के कमी केले पाहिजे. तसे झाल्यास २०३० पर्यंत नऊ लाख मृत्यू रोखता येऊ शकतात, असं जागतिक आरोग्य संघटनेचे यूरोपातील डायरेक्टर हँस क्लूज यांनी सांगितले.

यूरोपात ३० ते ७९ वयोगटातील तीनपैकी एक प्रौढ व्यक्ती उच्च रक्तदाबाने पीडित आहे. त्याचे मुख्य कारण मीठ आहे. यूरोपात ५३ पैकी ५१ देशात प्रतिदिन मिठाचे सेवन करण्याचे प्रमाण ५ ग्रॅमपेक्षा अधिक आहे. आरोग्य संघटनेने ५ ग्रॅम किंवा त्यापेक्षा कमी मीठ खाण्याचा सल्ला दिला आहे. म्हणजे एक चमचा किंवा त्यापेक्षा कमी मिठ खाण्याचा सल्ला दिला आहे. परंतु यूरोपात त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. प्रोसेस्ड फूड आणि स्नॅक्स खाण्यावर यूरोपातील लोक भर देतात, त्यात मीठाचे सर्वाधिक प्रमाण असते. त्यामुळे हे पदार्थ खाणे टाळले पाहिजे, असे सांगण्यात येत आहे.

प्रमाणापेक्षा अधिक मीठ खाल्ल्याने रक्तदाब वाढतो. त्यामुळे हृदयाशी संबंधित आजार होऊ शकतो. हृदयविकाराचा झटका येऊ शकतो, असे आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे. जगात सर्वाधिक उच्च रक्तदाबाचे रोगी यूरोपात आहेत. आरोग्य संघटनेच्या रिपोर्टनुसार, महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये हृदयरोगाने मरण्याचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण २.५ असे आहे.

पूर्व यूरोप आणि मध्य आशियात पश्चिम यूरोपाच्या तुलनेत ३० ते ६९ वर्षाच्या लोकांचे हृदय रोगाने मरण्याचे प्रमाण पाच टक्क्याने वाढण्याची अधिक शक्यता आहे. त्यावरून मीठ खाणे किती घातक आहे, हे स्पष्ट आधोरेखित होते. ही आकडेवारी यूरोपातील असली तरी कुठल्याही देशातील व्यक्तीने मिठाचे अत्याधिक सेवन केल्यास त्याला हृदयाशी संबंधित आजाराला सामोरे जावे लागते. त्यामुळे मीठ खाताना प्रमाणशीरच असले पाहिजे, असेही आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे.

# रायगडात महायुतीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष




**नागोठणे : बातमीदार**

रायगड रत्नागिरी लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचा प्रचंड बहुमताने विजय झाल्याचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फटाकांच्या आतषबाजीत विजयोत्सव साजरा केला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरापर्यंत रॅली काढण्यात आली. ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच या रॅलीदरम्यान चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, डॉ. राजेंद्र धात्रक, विलास चौलकर, भाजप नेते किशोर म्हात्रे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष बाळासाहेब टके, उपाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, महिला उपाध्यक्ष रिचा धात्रक, शहर उपाध्यक्ष प्रतीभा तेरडे, ग्रामपंचायत सदस्य पूनम काळे, सिराज पानसरे, प्रकाश जैन, अनिल काळे, हिराजी शिंदे, दिनेश घाग, रोहिदास हातनोलकर, जुगनशेठ जैन, बिपीन सोष्टे, दिलीप शहासने, मंगेश तेरडे, राउफ कडवेकर, काझीम पानसरे, दिनेश घाग, ॲड. श्रीकांत रावकर, ॲड. रमण जाधव, मनोज टके, चेतन टके, केतन टके, जगदीश दिवेकर, अक्षय नागोठणेकर, पवित्र पोलसानी, वासिम बोडोरे, तात्या पोत्रिक, रयान पानसरे आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### जनता विकासालाच मत देते –किशोर म्हात्रे

***रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांनी पुन्हा एकदा घवघवीत यश संपादित केले. गेल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत खूप विकासकामे केली आहेत. त्याच विकासकामांच्या जोरावर जनतेने तटकरे साहेबांना भरघोस मतदान करून आपले प्रेम व्यक्त केले आहे. येणाऱ्या काळात खासदार तटकरे केंद्रीय मंत्री होतील आणि उर्वरित मतदारसंघातील कामे पूर्ण करतील, असा विश्वास भाजप नेते किशोर म्हात्रे यांनी व्यक्त केले.***

**चौक : प्रतिनिधी**

मावळचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांचा विजय निश्चित झाल्यानंतर चौक येथील भाजपच्या कार्यकर्त्यांनी विजयोत्सव साजरा केला.

लोकसभेच्या निवडणुकीतील मावळ लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी पुणे येथे सुरू झाली. महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे व ठाकरे गटाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात अटीतटीची लढत झाली. सकाळी मतमोजणी सुरू झाल्यावर संजोग वाघेरे यांनी आघाडी घेतल्याचे दिसत होते, पण दुपारनंतर श्रीरंग बारणे यांचे मताधिक्क्य वाढताना दिसत होते. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्ते यांच्यात उत्साह दिसून लागला. दुपारनंतर श्रीरंग बारणे यांची मत मोजणीत आघाडी दिसून आल्यावर चौक येथील भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद भोईर, अभिजीत देशमुख, चौक शहराध्यक्ष व माजी उपसरपंच गणेश कदम यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष सागर ओसवाल, उपसरपंच सुभाष पवार, कीर्ती शहा, संतोष तांडेल, दत्ता भोईर, मोहन मुकादम आणि महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. चौक बाजारपेठेत फटाके फोडून आणि मिठाई वाटून आनंद साजरा केला.





**मुरुड : महायुतीचे रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार सुनील तटकरे निवडून येताच त्यांचे अभिनंदन माजी नगरसेवक मनोज भगत व त्यांचे सहकाऱ्यांनी केले.** (छाया : संजय करडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

लोकसभेसाठी निवडणुकीचा निकाल मंगळवारी (दि.४) घोषित करण्यात आला. मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयाने हॅट्ट्रीक साधली आहे. श्रीरंग बारणे यांची आघाडी १९ फेऱ्यांअंती एक लाखांच्या घरात गेल्यावर शिवसैनिकांनी कर्जतमध्ये मोठा जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी करीत एकमेकांना पेढे भरवत जल्लोष केला.

लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होणार असल्याने सगळ्यांचीच उत्सुकता ताणली गेली होती. नेरळ येथे महावीर पेठेत भाजपकडून निकालाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी आघाडी घेतल्यानंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष साजरा केला. या वेळी पं. स. माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, विभाग प्रमुख रत्नाकर बडेकर, अशोक मोरे, भानुदास धुळे, विलास मोडक, राकेश दळवी, शाम पवाळी, विश्वनाथ थोरवे आदींसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयामध्येही जल्लोष करण्यात आला. रत्नाकर बडेकर यांनी, हा विजय महायुतीतील सर्व पक्षातील कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचा आहे, असे स्पष्ट केले.

संकेत भासे यांनी, आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली या मतदारसंघात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. त्यामुळे हे यश मिळाले, असे सांगितले.

**खोपोली : प्रतिनिधी**

लोकसभा मावळ मतदारसंघात महायुतीतर्फे तिसऱ्यांदा निवडणूक लढवणारे श्रीरंग बारणे यांनी ९६ हजार ६१५ मताधिक्क्याने विजय प्राप्त केल्याने कर्जत-खालापुरात कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

मावळ मतदारसंघात महायुतीचे श्रीरंग बारणे, व इंडिया आघाडीचे संजोग वाघेरे यांच्यात चुरशीची लढाई झाली. दोन्ही उमेदवारांनी सर्व स्तरावर जाऊन प्रचारात कुठेही कमी पडणार नाही हे दाखवून दिले. त्यामुळे अंतिम क्षणापर्यंत कुठलाही अंदाज व्यक्त करता आला नाही. मराठा आरक्षण संघर्ष समितीने संजोग वाघेरे यांना पाठिंबा दिल्यामुळे ते विजयी होतील, असा ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा सूर होता, पण मराठा आरक्षण समितीतच पाठिंबा देण्यावरून फूट पडली आणि त्यानंतर मात्र बारणे यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला. श्रीरंग बारणे यांनी तिसऱ्यांदा गड राखण्यास यशस्वी झाले.

दरम्यान श्रीरंग बारणे यांनी प्रारंभीपासून मतमोजणीत घेतलेली आघाडी पाहता, ती शेवटपर्यंत टिकून राहिली. महायुतीचे श्रीरंग बारणे सहा लाख ९२ हजार ८३२ तर इंडिया आघाडीचे संजोग वाघेरे यांना पाच लाख ९६ हजार २१७ मते मिळाली.

दरम्यान मावळ मतदारसंघात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जागोजागी श्रीरंग बारणे यांच्या विजयाचे बॅनर झळकावले आहेत, तर सोशल मीडियावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



### मान्सूनपूर्व पावसाने उकाड्यात वाढ

**अलिबाग :** परिसरात सोमवारी मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. यामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला, मात्र मंगळवारी उकाड्यात वाढ झालेली जाणवली. अचानक आलेल्या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली. या बदललेल्या वातावरणामुळे तात्पुरते समाधान मिळाले, मात्र काही क्षणातच पुन्हा एकदा उकाड्याला सुरुवात झाली आहे.


**परिशिष्ट क्र. १६**

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या या संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ... धारण करणाऱ्या **श्रीमती/ सुलोचना विनायक नाईक** यांचे तारीख **१६/०४/२०२४** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी/ दुपारी **१२.००** ते सकाळी/ दुपारी **४.००** वा पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक :

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**


# पार्ले-दिविल ओव्हरब्रिजदरम्यान सर्व्हिस रोडवर पार्किंग झोन


**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान पोलादपूर तालुक्यातील पार्ले ते दिविल ओव्हरब्रिजच्या दुतर्फा असलेल्या सर्व्हिस रोडवर ट्रक, कंटेनर, टँकर्सचा पार्किंग झोन तयार झाले आहे. येथे असलेल्या ढाब्याचे स्वत:चे पार्किंग असूनही सर्व्हिस रोडचा सर्रास वापर केला जात असल्याने अपघात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या सर्व्हिस रोडला कॅटलपास आणि अंडरपास भुयारी मार्ग करण्यात आले असून याद्वारे पार्ले गावठाण, बौद्धवाडी आणि आदिवासीवाडीतील ग्रामस्थांना पश्चिमेकडील लोकवस्ती आणि पूर्वेकडील नदीपात्र तसेच शेतजमिनी आणि गुरांचे वाडे आणि शेतघरांकडे ये-जा करणे शक्य होते. या सर्व्हिस रोडच्या मधोमध असलेल्या ओव्हरब्रिजवरून राष्ट्रीय महामार्गाची वाहतूक सुरू असून दिवील केटी बंधाऱ्याच्या आधी काही अंतरावर हा ओव्हरब्रिज संपताच राजस्थानी हॉटेलमध्ये येणाऱ्या प्युअर व्हेज वाहतुकदार ड्रायव्हर व क्लिनरच्या ग्राहकांच्या ट्रक, कंटेनर, टँकर्स आदी वाहनांचे नदीपात्रालगत मातीचा भराव करून ढाबा बांधण्यात आला आहे.

वाहतुकदारांमध्ये राजस्थान तसेच गुजरात राज्यातील शाकाहारी वाहतुकदारांची संख्या अधिक असल्याने याठिकाणी वाहनांची गर्दी सर्व्हिस रोडपर्यंत होत असल्याचे दिसून येत आहे. पश्चिमेकडील सर्व्हिस रोडवर पार्ले ग्रामस्थांना ये-जा करण्याची सुविधा असताना याठिकाणी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या या अवजड वाहनांची दाटी दिसून येत आहे. दिवसा व रात्रीदेखील वाहनांची गर्दी होत असल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग वाहतूक पोलीस आणि पोलादपूर पोलिसांनी तातडीने याबाबत योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी पार्ले येथील ग्रामस्थांकडून होत आहे.



# लायन्स सेकंड डिस्ट्रिक्ट व्हाईस गव्हर्नरपदी प्रवीण सरनाईक

### निवडणुकीत झाली निवड



**मुरूड : प्रतिनिधी**

डिस्ट्रिक्ट रायगड ३२३१-४ची लायन्स गव्हर्नरपदासाठी नुकतीच निवडणूक पार पडली. ऐरोली, वाशी, नवी मुंबईपासून महाडपर्यंत या लायन्स मतदारसंघाची व्याप्ती असून एकूण ५५ क्लब आणि १८०० सदस्य यात सहभागी झाले. या निवडणुकीत अलिबाग लायन्सचे प्रवीण सरनाईक प्रचंड मताधिक्याने विजयी झाले.

अलिबाग, मांडवा, पोयनाड, श्रीबाग, रोहा, नागोठणे, महाड, वाशी, नवी मुंबई, खारघर, मुरूड, नागाव तसेच अलिबाग डायमंड क्लब आदी क्लबचा महत्त्वाचा वाटा आपल्या विजयात असल्याचे मान्य करीत प्रियदर्शनी पाटील, संजय पाटील, अनिल म्हात्रे, नयन कवळे, नितीन अधिकारी, प्रदीप नाईक, प्रदीप सिनकर, अनिल जाधव, महेंद्र पाटील, अंकिता म्हात्रे, प्रीतम गांधी, आशा बोराडे, ॲड. प्रदीप पाटील यांनी आपल्या विजयासाठी मेहनत घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

समाजातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील राहण्याचे त्यांनी अभिवचन दिले.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 01. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-14/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031320** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407, Mahindra Bolero Camper or similar Type) services along with fuel and driver at Substation Maintenance Sub-Division Mangaon under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,98,944/- (including GST)** |
| 02. | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-15/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031026** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type (i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Kandalgaon Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- (including GST)** |
| 03. | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-16/2024-25 Date:-05.06.2024 **RFx No.7000031027** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type (i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Vile Bhagad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- (including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST.

Bid submission is from 05.06.2024 @ 00:00 hrs to 11.06.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

# मोरबे धरणातील जलसाठ्यात घट

## अवघे २७ टक्के पाणी शिल्लक ▌ नवी मुंबईत विभागवार पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेने पाण्याची बचत व्हावी म्हणून विभागवार आठवड्यातून एक दिवस संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात अवघा २७ टक्के जलसाठा शिल्लक आहे. त्यामुळे जर पावसाळा लांबला तर पाण्याची अधिक टंचाई होऊ शकते. त्यामुळे पालिकेमार्फत आता शहरात विभागवार आठवड्यातील दोन दिवस पाणी बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन पाणीकपात सुरू केली आहे.



स्वतःच्या मालकीचे धरण असल्याने जलसंपन्न महापालिका म्हणून नवी मुंबई शहराची आज ओळख आहे. नवी मुंबई शहराला मोरबे धरणातून पाणीपुरवठा होत असतो. सध्या या धरणात ऑगस्टपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका क्षेत्राची पाणीपुरवठ्याची गरज लक्षात घेता मोरबे धरणाच्या उपलब्ध साठ्यातून पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये या आधी विभागवार आठवड्यातून एक दिवस संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद करून पाणीकपात सुरू होती, मात्र धरणात आता अवघा २७ टक्के साठा शिल्लक आहे. त्यामुळे पाऊस जर लांबला, तर पाण्याची टंचाई अधिक जाणवू शकते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेने पाणीकपातीत वाढ केली आहे.

४ जून २०२४ पासून पुढील निर्णय येईपर्यंत सात विभागांत आठवड्यातून दोन दिवस संध्याकाळी पाणीपुरवठा बंद राहणार आहे, तसेच दिघा विभागात एमआयसीमार्फत पाणीपुरवठा होत असल्याने तेथील पाणीपुरवठा एमआयसीसीच्या शटडाऊननुसार बंद राहणार असल्याची माहिती अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी दिली आहे.

**विभागवार बंद असणारा पाणीपुरवठा**

१) सोमवार, गुरुवार – बेलापूर

२) मंगळवार, शनिवार – कोपरखैरणे

३) बुधवार, रविवार – घणसोली

४) गुरुवार, सोमवार – वाशी

५) शुक्रवार – ऐरोली (एक दिवस)

६) मंगळवार, शनिवार – नेरूळ

७) रविवार, बुधवार – तुर्भे

# एनएमएमटीच्या बसफेऱ्या वाढवण्याची मागणी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मागील दोन ते तीन वर्षांपासून उलवेमध्ये झपाट्याने गृहनिर्माण विकास होत आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिक स्थलांतर होत आहेत, मात्र त्यांना दळणवळणाच्या सुविधा अद्याप सुस्थितीत उपलब्ध नाहीत. एनएमटीने बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

पनवेल, उलवेमध्ये झपाट्याने विकास होत असून महामुंबई म्हणून ओळखले जात आहे. या ठिकाणी गृहनिर्माण विकासाबरोबरच मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चरही उभे राहत आहे. अटल सेतू, शिवडी न्हावा-शेवा लिंक, रेल्वे इत्यादी दळणवळणाच्या सुविधेने मुंबई, नवी मुंबई शहरे जवळ आली आहेत. त्यामुळे भविष्यातील विकास पाहता या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढत आहे. उलवेला जाण्यासाठी रिक्षा, बस आणि रेल्वे यांची सुविधा आहे, परंतु बस आणि रेल्वेची फ्रिक्वेन्सी कमी आहे.

नेरूळ आणि बेलापूर वरून दर ४० ते ४५ मिनिटांनी रेल्वे आहे. तसेच नेरूळ आणि बेलापूर होऊन एनएमएमटीच्या बस ही उपलब्ध आहेत, मात्र १६ नंबर बस ही दर दोन तासांनी येते. त्यामुळे १६,१७ आणि २३ नंबरच्या बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. बस आणि रेल्वे मधून २० ते ३० रुपयांनी प्रवास होतो, मात्र रिक्षाने गेल्यास जादा खर्चिक होते आणि वेळही वाया जातो. त्यामुळे या ठिकाणी एनएमएमटीने बसच्या फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त व्यापक लोकसहभागातून वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिननिमित्त नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण मोहीमेत लोकसहभागावर विशेष भर दिला जात आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी करावयाच्या वृक्षारोपणाचा कृती आराखडा उद्यान विभागाने तयार केला असून १.५ लाख देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात येणार आहे.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करावयाच्या वृक्ष लागवडीसाठी उद्यान विभागाकडे ३५ हजारांहून अधिक देशी वृक्षरोपे उपलब्ध असून व्यापक लोकसहभाग घेत या वृक्षरोपांची योग्य जागी लागवड करण्यात येत आहे.

ज्या नागरिकांना तसेच संस्थांना लागवडीसाठी वृक्षरोपांची आवश्कता असेल त्यांनी ऋतुजा गवळी, सहा. आयुक्त (उद्यान) यांना ७९७७६३००६३ या क्रमांकावर तसेच प्रकाश गिरी, उद्यान अधिक्षक यांना ९३२२९१२८०१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवहान सर्व माध्यमांतून करण्यात आले होते. या आवाहनास नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला असून वृक्षरोपे, वृक्षरोपणासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी १५०हून अधिक व्यक्ती, संस्था यांनी महापालिका उद्यान विभागाकडे अर्ज दिले आहेत. नागरिक व संस्थांच्या मागणीनुसार त्यांना लागवडीसाठी ११ हजारहून अधिक देशी वृक्षारोपांचे वाटप करण्यात आले आहे तसेच त्यामधील काही जणांना लागवडीसाठी जागाही सूचित करण्यात आलेल्या आहेत.

यावर्षी जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना आमची जमीन, आमचे भविष्य अशी असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येत आहे. वृक्षारोपणासाठी महापालिकेमार्फत तुर्भे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, कोपखैरणे निसर्गोद्यान, मीनाताई ठाकरे उद्यान वाशी, नेरुळ पोलीस स्टेशनसमोर, साने गुरुजी उद्यान दिघा अशा विविध जागांवर वृक्षारोपण करण्यात येणार असून कांचन, चिंच, मोहगना पारिजात, सिताफळ, जांभूळ, निंब, आंबा, बांबू अशा पक्ष्यांना आकर्षित करतील व नवी मुंबईच्या जैवविविधतेत भर पडेल, अशा देशी वृक्षारोपांची लागवड करण्यात येत आहे.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईकर नागरिकांना सोबत घेत देशी वृक्षरोपांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात येत असून या मोहीमेमध्ये वृक्षप्रेमी नागरिकांनी सहभागी होऊन आपले नवी मुंबई शहर हरित व पर्यावरणशील बनविण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापलिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नवी मुंबईतील दरडग्रस्त ठिकाणांच्या याद्यांची प्रतीक्षा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहर हे पूर्वेला सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये वसले आहे. या डोंगररांगाच्या पायथ्याशी मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती असून एमआयडीसीच्या कंपन्याही आहेत. नवी मुंबईतील या डोंगररांगाच्या पायथ्याशी असणाऱ्या ठिकाणी छोट्या मोठ्या दरडी कोसळण्याच्या घटना याआधीही घडल्या आहेत. यात मोठी जीवित किंवा वित्तहानी झाली नसली तरी मान्सून तोंडावर आला असताना नवी मुंबई महापालिकेने अद्याप दरडग्रस्त ठिकाणांची यादी प्रसिद्ध केलेली नाही तसेच दरडग्रस्त भागातील रहिवाशांनाही कोणतीही सूचना दिली नसल्याने त्यांच्यामध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महापालिकेने दरडग्रस्त



भागांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

गेल्या वर्षी खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे घडलेल्या दरड दुर्घटनेमध्ये संपूर्ण गावच उद्ध्वस्त झाले होते. गेल्या वर्षी नवी मुंबईत दरडी कोसळण्याच्या एकूण २० घटना घडल्या होत्या. यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नसली तरी या घटनांच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील दरडग्रस्त भागांकडे पालिका प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक असल्याकडे नागरिकांनी लक्ष वेधले आहे. दरडग्रस्त भागांमध्ये पालिकेकडून फलक लावणेही गरजेचे आहे. पावसाळ्याच्या कालावधीत दरडग्रस्त भागातील नागरिकांना धोका असण्याची शक्यता आहे. त्यासाठी येथील नागरिकांना धोक्याची कल्पना देऊन त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवणे अपेक्षित आहे, परंतु पालिकेकडून अद्याप दरडग्रस्त भागांची यादीच जाहीर झालेली नाही. कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये, याची दक्षताही पालिकेकडून घेणे आवश्यक आहे, मात्र या संदर्भात पालिका प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

**दरवर्षी दरड कोसळण्याची ठिकाणे**

**दिघा** – कन्हैया नगर, इलठण पाडा, विजय नगर, विष्णुनगर.

**तुर्भे** – तुर्भे स्टोअर साईनाथ मंदिराजवळ, तुर्भे टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील वॉटर ऑइल कंपनीजवळ, हनुमान नगर येथील संजीवनी क्वारी, इंदिरानगर येथील अमूल डेअरी नाला.

**नेरूळ** – रमेश मेटल क्वारी, वाघानी प्लॉट महात्मा गांधी नगर, टेक्नो प्रिकास्ट क्वॉरी, बालाजी टेकडी सेक्टर २०, बोनसरी एमआयडीसी.

**घणसोली** – निब्बाण टेकडी, भीमनगर, गौतम नगर, साईबाबा नगर परिसर, बेलापूर विभागातील इन्कॅम टॅक्स कॉलनी सेक्टर २१, पार्क हॉटेल, दुर्गामाता मंदिर, संभाजी नगर रमाबाई नगर, सीबीडी सेक्टर ८ विकसिनी सोसायटी

ऐरोली, वाशी, कोपरखैरणेमध्ये दरड कोसळण्याचे एकही ठिकाण नाही.

# गणेश मैदानातील प्रेक्षक गॅलरी दुरुस्तीची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर १२ येथील रामलीला श्री गणेश मैदान येथील प्रेक्षक गॅलरी मोडकळीस आली असल्याने क्रीडाप्रेमींकडून नाराजी व्यक्त होत आहे. या प्रेक्षक गॅलरीची दुरुस्ती, करावी अन्यथा नव्याने ती बसवण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

रामलीला श्री गणेश मैदानात सारसोळे, कुकशेत आणि विविध सेक्टरमधील खेळाडू सराव करण्यासाठी येत असतात. येथील खेळ पाहता यावेत यासाठी नवी मुंबई मनपा क्रीडा विभागाने या ठिकाणी प्रेक्षक गॅलरी बांधली आहे, मात्र मागील सहा महिन्यांपासून या प्रेक्षक गॅलरीची दुर्दशा झाली आहे. त्यामुळे त्याची त्वरित दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे.

> **रामलीला गणेश मैदानावर स्पर्धा पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींची नेहमीच गर्दी असते. इथे असलेली नादुरुस्त प्रेक्षक गॅलरी दुरूस्त करण्यात यावी.**
> **–कपिल पाटील, गावदेवी फोर्टी प्लस, सारसोळे**

# चाऱ्याच्या अभावामुळे मोकाट गुरांना उकिरड्याचा आधार

## पनवेल परिसरातील जनावरांचे आरोग्य धोक्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाचा तडाखा सर्वत्रच वाढला आहे. अशातच जनावरांसाठी हिरव्या व सुक्या चाऱ्याचादेखील अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना खाण्यासाठी अन्न पाण्याची कमतरता भासू लागली आहे. ही मोकाट गुरे शहरातील डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावर जाऊन मिळेल ते खात आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पनवेलमधील रोझ बाजार व एपीएमसी परिसरात उकिरड्यावर सकाळ पासूनच मुकाट गुरांची गर्दी असते. येथे भाजीपाल्यासह इतर कचरा ही गुरे अस्ताव्यस्त करतात त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्यदेखील धोक्यात येते. बऱ्याचवेळा



टाकुन दिलेले अन्नपदार्थ पिशव्यांमध्ये असते. परिणामी गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक जाते. प्लास्टिक व सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, अन्नाच्या शोधात सतत चालल्याने त्यांची ऊर्जा कमी होते. अशक्तपणा येतो. डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावरील कचऱ्यात धातू तसेच अनुकुचिदार वस्तू उदा. घरगुती वापराची सुई, इंजेक्शनच्या सुया आदी घटक असतात. त्या पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्ननलिकेला इजा पोहचते.

सतत प्लास्टिक खाल्ल्यामुळे ते त्यांच्या पोटात साठते. त्यामूळे गुरे मरतातदेखील. काही वेळेस अशा मेलेल्या गुरांची हाडे इतर गुरे आणि प्राणी चघळतात व पर्यायाने त्यामुळे त्यांचादेखील मृत्यू होतो. आणि हे दुष्टचक्र सुरूच राहते. उकरिड्यावरील प्लास्टिक व खराब अन्न खाऊन मोकाट गुरांचे आरोग्य धोक्यात येते. शिवाय घाण व दुर्गंधीदेखील पसरते. त्यामुळे यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नये. त्यांना पेंढा किंवा सुके गवत खाऊ घालावे. कचऱ्यात किंवा उकिरड्यावर टाकलेले अन्न पदार्थ खाऊन गुरांची पचनक्रिया बिघडते. मानवी खाद्य हे जनावरांसाठी नाही. वारंवार प्लास्टिक पोटात गेल्याने ते पोटात साठून गुरांचा मृत्यूदेखील होऊ शकतो. शहरी तसेच ग्रामीण भागात निसर्गपूरक जीवन अंगिकारणे गरजेचे आहे.

# शैक्षणिक साहित्याने बाजार गजबजला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शैक्षणिक सत्रातील शाळेची पहिली घंटा वाजण्यापूर्वी शैक्षणिक साहित्य खरेदीकडे पालकांची पाऊले वळत आहेत.



राज्यातील शाळा उघडण्यात येत असल्याने नवी मुंबईतील बाजारपेठा आणि शैक्षणिक साहित्याच्या दुकानांमध्ये पालकांची गर्दी पाहायला मिळत आहे. सध्या दुकानात वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्सिल, कंपास बॉक्स, आकर्षक पेन, वॉटरबॅग, स्कूलबॅग आदींनी दुकाने सजली आहेत, मात्र शैक्षणिक साहित्याचे दर वाढले असल्याने पालकांच्या खिशाला यंदा अतिरिक्त कात्री लागली आहे.

शाळा सुरू होण्यापूर्वी गणवेश, नवे बुट, दप्तर, वह्या-पुस्तके, कंपासपेटी या शालेय साहित्याची खरेदी करण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांनी विविध मार्केटसह डीमार्ट व स्टेशनरीच्या दुकानमध्ये खरेदी साठी गर्दी केली आहे. शाळा १० जून पासून उघडणार आहेत. यंदाही बाजारपेठेत विविध प्रकारच्या लहानग्यांना आकर्षित करतील, अशा वह्या उपलब्ध आहेत. मुलांच्या आवडीनुसार कार्टून, गाड्यांची चित्रे, खेळाडू, निसर्ग यांची चित्रे वह्यांवर दिसत आहेत. विविध रंगाच्या, कार्टूनची चित्रे असणाऱ्या व विविध आकाराच्या स्कूल बॅग्ज बाजारात आल्या आहेत. यावर कार्टून्सची चित्रे, बार्बी डॉल, स्पायडर मॅन यांची चित्रे असलेल्या बॅग तसेच टिफीन बॉक्सही विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत,मात्र याच्या किमती जास्त असल्याने अनेक दुकानांत पालक मुलांच्या हट्टाला आवर घालताना दिसून आले. खोडरबर, पेन्सिल, पेन, रंग पेटी असा एकत्रित संचदेखील बाजारात उपलब्ध असल्याने पालकांचा एकत्रित संच घेण्याकडे वाढता कल असल्याचे दुकानदारां कडून सांगण्यात आले.

शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांना आकर्षित करण्यासाठी डीमार्ट आणि मॉलमधील मोठे विक्रेते मोठ्या ऑफर देत असल्याने शहरातील डीमार्ट, मॉलमध्ये वर्दळ वाढू लागली आहे. १० तारखेपर्यंत गावी गेलेले सर्वजण नवी मुंबईत येणार असल्याने त्यानंतर बाजारात शैक्षणिक साहित्य खरेदी करीता मोठी गर्दी होणार असल्याने अनेकांनी आता पासूनच खरेदीला सुरुवात केली आहे. त्यात डीमार्ट व मॉलमध्ये शैक्षणिक वस्तूंवर आकर्षक २० ते ३० टक्के सूट, बॅग आणि टिफिन, बॉटल्स खरेदीवर २० ते ४० टक्के सूट दिली आहे. त्यामुळे वस्तूंच्या किमती कमी असल्याने येथे जाऊन खरेदी करण्याला पालकांनी प्राधान्य दिले. गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी वह्यांचा किमती वाढल्या आहेत. तसेच इतर शैक्षणिक साहित्य जसे की, पट्टी, पेन्सिल, कंपास हेदेखील महाग झाले आहेत.

# केनियातील मुलीवर नवी मुंबईत अस्थिमज्जा प्रत्यारोपण यशस्वी

**नवी मुंबई : बातमीदार**

अपोलो कॅन्सर सेंटर, नवी मुंबईतील (एसीसीएनएम) डॉक्टरांनी सिकलसेल रोगावर मात करण्यासाठी बोन मॅरो ट्रान्सप्लांट (बीएमटी) ची क्षमता दर्शविणारी गुंतागुंतीची यशस्वी प्रक्रिया करून १४ महिन्यांच्या मुलीवर यशस्वी उपचार केले आहेत.

केनियामधील रहिवासी असलेल्या या लहान मुलीला सिकलसेल रोग असल्याचे निदान झाले. दीर्घकाळ उद्भवणाऱ्या या आजारामुळे गंभीर परिणाम दिसून येतात, ज्यासाठी ब्लड ट्रान्सफ्युजनची आवश्यकता असते.

रुग्णाला सिकलसेल रोग झाल्यामुळे तिला वारंवार वेदना होत होत्या, ज्यास व्हॅस्को-ओक्ल्युसिव्ह क्राइसिस म्हणतात आणि तिला वारंवार ब्लड ट्रान्सफ्युजनची गरज पडत होती. तिच्या या आजारामुळे तिचे जीवन असह्य झाले होते, आणि कुटुंबावर आर्थिक भार वाढत होता. अखेर ते आशेच्या शोधात अपोलो कॅन्सर सेंटर (एसीसी) कडे आले. सखोल मूल्यमापन केल्यानंतर, अपोलो येथील बाल-हेमॅटो-ऑन्कोलॉजिस्ट व सल्लागार डॉ. विपिन खंडेलवाल यांनी असा निर्णय घेतला की मुलीवर बीएमटी केले पाहिजे. मग त्यानंतर दात्याचा शोध सुरू झाला. सुदैवाने तिचा ११ वर्षांचा भाऊ परिपूर्ण एचएलए जुळणारा ठरला.

# जसखारच्या साहिल ठाकूरचे पदवी परीक्षेत देदीप्यमान यश

**उरण : बातमीदार**

वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथील बीएमएस शाखेचा विद्यार्थी साहिल सुनील ठाकूर याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ झालेल्या पदवी परीक्षेत शेवटच्या सहामाही परीक्षेत १० ग्रेस गुणांकन मिळवून बीएमएस पदवी शाखेत महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकवला. त्याच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

साहिल ठाकूर हा जसखार गावाचे माजी सरपंच व साईभक्त नारायण रघुनाथ ठाकूर यांचा नातू आहे. प्रचंड जिद्द व मेहनत, अभ्यासू व्यक्तिमत्व असलेला साहिल प्राथमिक शिक्षण घेत असल्यापासून नेहमीच चांगल्या गुणांनी पुढे जात होता. महाविद्यालयातील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व अविरत अभ्यास करून त्याने हे यश संपादित करून त्याने आपल्या गावाचे व घराण्याचे नाव उंचावले याबद्दल त्याचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तीकडून अभिनंदन केले जात आहे. त्याला पुढील शैक्षणिक प्रवासासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, मित्र वर्गांनी, चाहत्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



# खडसांबळेतील बंधाऱ्याची वर्षभरातच दुरवस्था

## शासनाचा लाखो रुपयांचा निधी वाया; ठेकेदारावर कारवाईची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील खडसांबळे येथील नदीवरील अवघ्या एक वर्षापूर्वी बांधण्यात आलेला बंधाऱ्याची पूर्णतः दुरवस्था झाली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई उद्‌भवू नये यासाठी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे बांधकाम एका वर्षात कोसळले आहे. एकाच पावसाळ्यात बंधारा पूर्णतः तुटला आहे. त्यामुळे यावर्षी पाण्याची साठवण झाली नाही आणि परिणामी पाणीटंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागले, तसेच शासनाचा लाखो रुपयांचा निधीदेखील वाया गेला आहे.

पुन्हा अशी परिस्थिती उद्‌भवू नये यासाठी संबंधित ठेकेदारावर निकृष्ट दर्जाचे काम केल्याबद्दल कारवाई करून तो बंधारा पुन्हा बांधण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे बंधारा कोसळला असून बंधाऱ्याचे खालील बांधकाम वाहून जाऊन संपूर्ण बंधारा कोसळला आहे. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने खडसांबळे येथील बंधाऱ्यात पाणी साठवण होत नाही. परिणामी बंधाऱ्याचा तेथील ग्रामस्थांना, जनावरांना उपयोग झाला नाही. त्यामुळे शासनाने याकडे गांभिर्याने तत्काळ लक्ष देऊन संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी व पुन्हा बंधारा बांधावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



**कोसळलेल्या बंधाऱ्यामुळे गेला असता तरुणाचा जीव**

*खडसांबळे येथील निकृष्ट दर्जाच्या बंधारा कोसळून बंधाऱ्याला मोठमोठे भगदाड पडले आहेत. त्यामुळे तेथे नदीवर पोहत असताना एक मुलगा त्या कोसळून पडलेल्या भगदाडामध्ये अडकला होता. सुदैवाने त्याचा जीव वाचला, मात्र पुन्हा अशी जीवघेणी घटना घडू नये म्हणून लवकरात लवकर बंधारा पुन्हा बांधणे गरजेचे आहे.*

**अशा निकृष्ट दर्जाच्या कामाबद्दल संबंधित खात्याचे अधिकारी व ठेकेदार यांची बैठक घेणार आहे. त्यांना या निकृष्ट दर्जाच्या कामाची विचारणा करून संबंधित कामाची पाहणी करून मग ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल.**

**–लता मोहिते, गटविकास अधिकारी, सुधागड**

# खालापुरात माती उत्खनन जोरात

## शासनाचा महसूल बुडवून माती चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

मातीमाफीयांचा खालापूरसह, खोपोलीत सुळसुळाट झाला असून शासनाची कोणतीही रॉयल्टी न भरता अनेक ठिकाणी उत्खनन सुरू आहे. चौक ग्रामपंचायत हद्दीत गुरचरण भागात विनापरवाना सुरू असलेले माती उत्खनन संतप्त ग्रामस्थांनी मंगळवारी (दि.४) थांबवले. शासनाचा महसूल बुडवणाऱ्या मातीमाफियांवर दंडात्मक तसेच फौजदारी गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी होत आहे.

तालुक्यात कारखानदारी, गृहप्रकल्प, वीटभट्टी व्यवसाय, याशिवाय अनेक ठिकाणी सुरू असलेली भरावाची कामे यासाठी मातीची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. पावसाळ्याचे चार महिने उत्खननावर मर्यादा येणार असल्याने तालुक्यात कुंभिवली, चौक, वावोशीसह अनेक भागात जेसीबीच्या सहाय्याने दररोज शेकडो ब्रास माती उत्खनन होत आहे. शासनाची कोणतीही परवानगी न घेता आवश्यक ती रॉयल्टी न भरता माती उत्खनन सुरू असल्याने शासनाच्या डोळ्यात धुळफेक सुरू आहे.



**चौक गुरचरण भागात सुरू असलेल्या उत्खननाबाबत तहसीलदारांना तक्रार केल्यानंतर मंडळ अधिकारी पंचनामा करून गेले, परंतु आमची मागणी मातीचोरांवर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा, अशी आहे.**

**–नंदू मोरे, मानिवली चौक, ग्रामस्थ**

चौक नवीन वसाहतीतील गुरचरण भागात, सावरोली–खारपाडा मार्गावर, कुंभिवली गावाचे हद्दीत, खोपोली–पेण मार्गावर वावोशी हद्दीत माती चोरण्याचा सपाटाच सुरू आहे. चौक ग्रामपंचायत हद्दीत गुरचरण भागात विनापरवाना सुरू असलेले माती उत्खनन संतप्त ग्रामस्थांनी थांबवले असून शासनाचा महसूल बुडवणाऱ्या मातीमाफियांवर दंडात्मक तसेच फौजदारी गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी होत आहे.

# कर्जतमध्ये सुधाकर घारेंकडून गावबैठका

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी गावपातळीवर बैठका घेण्यावर भर दिला आहे.

सुधाकर घारे यांनी पाथरज जिल्हा परिषद वॉर्डातील कशेळे पंचायत समितीमधील गाव, वाडीवस्तीत जाण्यास सुरुवात केली आहे. तालुक्यातील गावांत, वाडीतील समस्या जाणून घेण्यासाठी तसेच आपल्या तालुक्यातील जनतेच्या समस्या समजून घेण्यासाठी यांच्याशी हितगुज साधण्यासाठी घारे पुढे सरसावले आहेत.



या वेळी त्यांच्यासोबत कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संपूर्ण टीम सोबत आहे. त्यात राष्ट्रवादीचे पदाधिकारी भरत भगत, अशोक भोपतराव, भगवान चंचे, एकनाथ धुळे, रंजना धुळे, दीपक श्रीखंडे, अरुण हरपुडे, हरेश घुडे, राम कोळंबे, शरद तवले, स्वप्नील पालकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सध्या तालुक्यात काही ठिकाणी पाणीटंचाई असल्याने घारे यांनी मोफत पाणीवाटपाची सुरुवात केली आहे.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. सोमवारी (दि.३) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३३६ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ५५ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

# माणगाव शिवसेनेमध्ये फेरबदल; पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका शिवसेनेमध्ये पदाधिकाऱ्यांमध्ये फेरबदल करून नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभेचे वारे वाहायला सुरुवात झाली आहे.

तरुणाईला शिवसेनेकडे आकर्षित करण्यासाठी नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन आमदार भरत गोगावले यांच्या आदेशाने जिल्हासंपर्क प्रमुख अरूण चाळके व दक्षिण रायगड



जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उपतालुकाप्रमुखपदी सुधीर पवार व जगदीश दोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना गोरेगाव विभागप्रमुखपदी युवा नेतृत्व दिनेश हरवंडकर, इंदापूर विभागप्रमुखपदी विश्वास उभारे, लोणेरे उपविभागप्रमुखपदी समाधान करकरे, पाटणूस उपविभागप्रमुखपदी मंगेश बटवले, पानसई उपविभागप्रमुखपदी भरत शांताराम दिघे, निजामपूर पूर्व उपविभागप्रमुखपदी संदिप गावडे, गोरेगाव उपविभागप्रमुखपदी दिनेश डवले यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत.

या वेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख निलिमा घोसाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख महेंद्र मानकर यांच्यासह माणगाव तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत माणगाव तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची कामगिरी चांगली झाली होती. लोकसभा निवडणुकीत पक्षाचा आदेश न पाळता पक्षविरोधी कार्यवाही करणाऱ्यांना पक्षातून काही दिवसांपूर्वी हकालपट्टी केली होती. विधानसभेसाठी याहून दुप्पट मेहनत करून महाड व श्रीवर्धन मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर मताधिक्य घेण्यासाठी भविष्यातदेखील मोठे फेरबदल पहावयास मिळणार असल्याचे शिवसेना दक्षिण रायगडचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातर्फे उद्योजक–प्राध्यापक चर्चासत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाद्वारे उद्योजक–प्राध्यापक चर्चासत्राचे आयोजन सोमवारी (दि.३) करण्यात आले होते.

या चर्चासत्रात विद्यापीठाचे विभाग प्रमुख, महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन व टाटा पावरच्या एकूण ४०पेक्षा अधिक प्रतिनिधींनी सहभाग दर्शविला. चर्चासत्रात महाड मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी पठारे प्रमुख पाहुणे म्हणून तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कारभारी काळे यांनी भूषविले. चर्चासत्रासाठी डॉ. संजय नलबलवार, डॉ. नीरज अग्रवाल, डॉ. एस.एम. पोरे आणि पदविका विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे यांची उपस्थित होते.

या चर्चासत्राच्या सुरवातीस उपस्थितीत उद्योग घटकांच्या प्रतिनिधींमार्फत विद्यापीठातील विविध विभागांना भेटी देण्यात आल्या. यानंतर उद्योजक–प्राध्यापकांच्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उद्योजकांनी त्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यापीठाचे आवश्यक योगदान याबाबत चर्चा झाली.

डॉ. संजय नलबलवार, डॉ. एस.एम. पोरे



व डॉ. मधुकर दाभाडे यांनी विद्यापीठाबाबत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) कारभारी विश्वनाथ काळे यांनी, औद्योगिक घटक व विद्यापीठ यांची संयुक्त कार्यप्रणाली विकसित भारत २०४७ महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मत मांडले, तसेच विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० विकसित भारत २०४७ व आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असे मत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे संभाजी पठारे यांनी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या सोईसुविधांबाबत समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांनी समाजातील, औद्योगिक, शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नवनवीन उत्पादनाची निर्मिती करावी तसेच औद्योगिक घटक व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील गरज लक्षात घेऊन विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविले पाहिजेत, असे मत व्यक्त केले.

## निवडक



**खोपोली : भाजपतर्फे शहर मध्यवर्ती कार्यालयात लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी विविध पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या.**



**माणगाव : सारा चौधरी हिने बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेतून ८७.८३ टक्के गुण संपादन केले. या यशाबद्दल तिचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सुरव तर्फे तळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सखाराम जाधव, पत्रकार सलीम शेख, दीपराज चौधरी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**



**माणगाव : आदर्श समतानगर येथील साई मंदिराच्या आठव्या वर्धापन दिन सोहळा कार्यक्रमात आमदार भरत गोगावले यांचे पुण्याचे उद्योजक सचिन मेहता यांनी स्वागत केले.**

# मुरूड तालुक्यात पेरणीपूर्व मशागतीची लगबग

**मुरूड : प्रतिनिधी**

संपूर्ण मे महिन्यात उष्णतेचा पारा ४० अंशांवर गेल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत, मात्र शेती पिकविल्याशिवाय गत्यंतर नसल्याने बळीराजा पेरणीपूर्व जमिन मशागतीमध्ये उन्हातान्हाची पर्वा न करता व्यस्त आहे.



धुळपेरणीपूर्वी नांगरणी बहुतेक ठिकाणी आटोपली आहे. बैल जोडीचा खर्च परवडत नसल्याने आता ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी केली जात आहे. धुळपेरणीला येत्या आठवड्यात सुरुवात होईल, अशी स्थिती आहे. पाऊस पडल्यानंतर उगवण झाल्यानंतर २० ते २२ दिवसानंतर भाताच्या लावणीला सुरुवात केली जाते. पूर्वी एकत्र कुटूंब पद्धती होती, मात्र अलिकडे लावणी मजुरी देऊनच केली जाते.

तालुक्यात भातशेतीची उत्पादकता चांगली आहे. धुळपेरणीपासून भात काढणीचा खर्च एकरी १५ ते १६ हजार येतो. भाताचे सुधारीत वाण अनेक असले तरी उताऱ्याला चांगले म्हणून पारंपरिक सुवर्णा हे वाण बहुतांश शेतकरी वापरतात. खासगी कृषी सेवा केंद्रात निरनिराळे भाताचे वाण विक्रीसाठी असले तरी सुवर्णा हेच वाण भात उताऱ्याला अधिक उतरले. त्यामुळे प्रगत वाणांना विशेष मागणी नसल्याची स्थिती आहे.

कृषी विभागातर्फे भात लागवड क्षेत्र वाढीसाठी प्रत्येक गावामध्ये कृषी सहाय्यकांमार्फत भात बियाण्याला बीजप्रक्रिया आणि उगवण क्षमता चाचणी प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांना भातलागवडीच्या आधुनिक पद्धतींविषयी सविस्तर मार्गदर्शन करून क्षेत्रवाढीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

भातपिकाची शेतीशाळा राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत भातपिक लागवडीचे प्रात्यक्षिक राबविण्यात येणार आहे, तसेच महाडीबीटी कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत कृषी अवजारे व यंत्रास अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. भातलागवड सुधारीत पद्धतीची प्रात्यक्षिके घेतली जातात हेक्टरी ९००० रु. अनुदान निविष्ठा स्वरूपात दिल्या जातात, परंतु तालुक्यात फक्त ३५ हेक्टर क्षेत्रासाठीचे लक्ष्यांक आहे. त्यामध्ये १० हेक्टर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व २५ हेक्टर आत्मा योजनेमधून दिले जाईल, तसेच तालुक्यात १५ मेपासून ठिकठिकाणी भात बीजप्रक्रिया व उगवण क्षमता चाचणीची प्रशिक्षणे व प्रात्यक्षिके कृषी सहाय्यकांमार्फत सुरू असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी दिली.

# ‘जेएसएस’तर्फे असिस्टंट नर्सिंग कोर्स

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उज्वल भविष्य सामाजिक संस्था व जनशिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.३) वरसोलीतील नानासाहेब कुंटे तांत्रिक विद्यालय येथे असिस्टंट नर्सिंग कोर्सचे उद्‌घाटन करण्यात आले. समाजातील बेरोजगारांना स्वतःच्या पायावर उभे राहून त्यांनी स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी संस्थेतर्फे पहिली बॅच मोफत शिकवण्यात येणार आहे.

जेएसएसचे चेअरमन डॉ. नितीन गांधी यांनी विद्यार्थ्यांना असिस्टंट कोर्सचे महत्त्व सांगितले, तसेच तांत्रिक विद्यालयाचे उदय जोशी यांनीसुद्धा



मार्गदर्शन केले. डायरेक्टर डॉ. विजय कोकणे, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष उज्वला चंदनशिव, डॉ. राजाराम हुलवान, सुरेंद्र जोशी, संचालक रोशन पंडित, डॉ. सतिष चिखलकर, कुमार ठाकूर, पूजा लाडे उपस्थित होते.

# नियमांचे उल्लंघन करीत वाहने नागावच्या किनाऱ्यावर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील वेगवेगळ्या समुद्रकिनारी पर्यटकांची वर्दळ आहे, मात्र काही पर्यटकांच्या अतिउत्साहीपणाचा फटका स्थानिकांना बसत आहे. नागाव समुद्रकिनारी काही पर्यटकांनी नियमांचे उल्लंघन करीत थेट समुद्रकिनाऱ्यावर वाहने उभी केली. त्यामुळे किनारी भागात फिरणाऱ्या पर्यटकांसह स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. अलिबाग पोलीस ठाण्याकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

अलिबाग, नागाव, आक्षी पर्यटकांच्या पसंतीला उतरणारे समुद्रकिनारे आहेत. सुट्टीच्या दिवशी या समुद्रकिनारी पर्यटकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे पर्यटकांनी हे किनारे फुलून जातात. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसह स्थानिकांची वर्दळ असते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने



या किनाऱ्यावर चारचाकी वाहनांना अलिबाग पोलिसांनी बंदी घातली आहे. रविवारी सुट्टीचा आनंद पर्यटक समुद्रकिनारी लुटत होते.

दरम्यान काही पर्यटकांनी त्यांची चारचाकी वाहने किनाऱ्यावर उभी केली होती. त्या ठिकाणी पर्यटक मौजमजा करीत होते, मात्र किनाऱ्यावर नियमांचे उल्लंघन करीत वाहने उभी करणाऱ्यांवर अलिबाग पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे समोर आले. पर्यटकांच्या या अतिउत्साहीपणामुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे बोलले जात आहे.

# अफगाणिस्तानकडून युगांडाचा धुव्वा

**गयाना : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पाचव्या सामन्यात अफगाणिस्तानने युगांडाचा १२५ धावांनी पराभव केला. या सामन्यात रहमानुल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी अफगाणिस्तानसाठी दमदार फलंदाजी केली आणि फजल हक फारूकीने पाच विकेट्स घेत युगांडाच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अफगाणिस्तानच्या १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडा अवघ्या ५८ धावांत सर्वबाद झाला.

गयानाच्या प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात युगांडाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो त्यांच्यासाठी अजिबात चांगला ठरला नाही. प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलेल्या अफगाणिस्तानने २० षटकांत ५ बाद १८३ धावा केल्या. रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी पहिल्या

## फारुकीच्या पाच विकेट्स



विकेटसाठी १५४ (८८ चेंडू) धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर युगांडाच्या गोलंदाजांनी दमदार पुनरागमन केले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

१४ षटकांपर्यंत भरघोस धावा देणाऱ्या युगांडाच्या गोलंदाजांनी शेवटच्या सहा षटकांत शानदार पुनरागमन करत अफगाणिस्तानला बॅकफूटवर ढकलले. या सहा षटकांत अफगाणिस्तानच्या फलंदाजांना एकही चौकार मारता आला नाही, मात्र युगांडाचे फलंदाज संघाला फारशी साथ देऊ शकले नाहीत. १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना युगांडाचा संघ १६ षटकांत ५८ धावांवर सर्वबाद झाला. रॉबिन्सन ओबुयाने संघासाठी सर्वांत मोठी खेळी खेळली. त्याने एका षटकाराच्या मदतीने १४ धावा केल्या.

युगांडाच्या ११ फलंदाजांपैकी फक्त दोन फलंदाज दुहेरी आकडा पार करू शकले. पहिल्याच षटकापासून संघाने विकेट्स गमावण्यास सुरुवात केली. पहिल्याच षटकात फजलहक फारुकीने रौनक पटेल (४) आणि रॉजर मुकासा (०) यांना सलग दोन चेंडूंवर पॅव्हेलियनमध्ये पाठवल्यामुळे संघाला पहिले दोन धक्के बसले. त्यानंतर दुसऱ्या षटकात सायमन सेसाझीच्या (४) रूपाने संघाने तिसरी विकेट गमावली. यानंतर संघाने पाचव्या षटकात दिनेश नाक्राणीच्या (६) रूपाने चौथी विकेट गमावली. त्यानंतर त्याच षटकात खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतलेल्या अल्पेश रामजानीच्या रूपाने संघाला पाचवा धक्का बसला.

अफगाणिस्तानकडून फजल हक फारुकीने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. यादरम्यान त्याने चार षटकांत केवळ नऊ धावा दिल्या. नवीन उल हक आणि कर्णधार राशिद खान यांना प्रत्येकी दोन विकेट्स मिळाल्या. नवीनने दोन षटकांत चार धावा आणि रशीदने चार षटकांत १२ धावा दिल्या. उर्वरित एक विकेट मुजीब उर रहमानच्या खात्यात आली. मुजीबने तीन षटकांत १६ धावा दिल्या.

# राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस चॅम्पियनशिपमध्ये रायगडच्या प्रतीक्षा शेरकरला कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२१वी सिनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस चॅम्पियनशिप पंजाबमधील मोहाली येथे पार पडली. या स्पर्धेत पुरुष व महिलांच्या संघाने कांस्यपदक जिंकले. महिलांच्या संघात रायगड जिल्ह्यातील खेळाडू प्रतीक्षा शेरकर हिचा समावेश होता.

स्पर्धेत देशभरातून २८ पुरुष व महिला संघांनी सहभाग नोंदविला. महाराष्ट्राच्या पुरुषांच्या संघाने छत्तीसगडचा २-१ने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने पंजाब संघाचा २-१ने पराभव करून सेमी फायनलमध्ये धडक मारली. सेमी फायनलमध्ये गुजरात संघाविरुद्ध खेळताना चुरशीच्या सामन्यात महाराष्ट्राचा २-१ने पराभव झाला व महाराष्ट्र संघाला कांस्यपदावर समाधान मानावे लागले.

कांस्यपदक विजेत्या पुरुषांच्या संघात ओम काकड, वीर जैन,



ऋतुराज सुवर्णकार (औरंगाबाद), साईराज साळुंके (पुणे), यशराज हुंदेकरी (धाराशिव), मोहित पाटील (जळगाव), पियुष पाटील, शाहरुख तांबोळी (सांगली) यांचा समावेश होता.

सांघिक प्रकारात महिलांच्या संघाने आंध्र प्रदेश आणि पंजाबचा पराभव करून कांस्यपदक पटकावले. या संघात प्रियंका हंगरगेकर, प्रेरणा देशमुख (धाराशिव), भक्ती जाधव (सोलापूर), रितिका मोरे, आयुष्या इंगवले (पुणे), विनिता चौधरी (बुलढाणा), प्रतीक्षा शेरेकर (रायगड), मयुरी मगदूम (सांगली) यांचा सहभाग होता.

वैयक्तिक दुहेरीमध्ये महाराष्ट्राच्या ओम काकड व वीर जैन या जोडीने मध्य प्रदेश तसेच उत्तर प्रदेशच्या खेळाडूंचा पराभव करून कांस्यपदकाची कमाई केली. स्पर्धा प्रचंड उष्णतेच्या लाटेत खेळवली गेली. तरीही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी उत्तम प्रदर्शन केले, असे सांगत सॉफ्ट टेनिस असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव रवींद्र सोनावणे व प्रशिक्षक निलेश हारदे यांनी समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र संघाच्या या कामगिरीबद्दल महाराष्ट्र ऑलिम्पिकचे महासचिव नामदेव शिरगावकर, सॉफ्ट टेनिस असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष सुनील पूर्णपात्रे, दीपक आर्डे, विल्सन अँड्रेस, रायगड जिल्हा सचिव स्वप्नील वारंगे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दक्षिण आफ्रिकेची श्रीलंकेवर मात; गोलंदाजांचा प्रभावी मारा

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

खेळाडूंचा कस पाहणाऱ्या खेळपट्टीवर आनरिख नॉर्किए (सात धावांत चार बळी), कगिसो रबाडा (२१ धावांत दोन बळी) व केशव महाराज (२२ धावांत दोन बळी) यांच्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेचा सहा गडी राखून सहज पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंका संघाचा डाव ७७ धावांत संपुष्टात आला. दक्षिण आफ्रिका संघानेदेखील खेळपट्टीकडे पाहता संयमाने खेळ करीत १६.२ षटकांत ४ बाद ८० धावा केल्या.

विश्वचषक स्पर्धेसाठी झटपट तयार करण्यात आलेल्या मैदानावरील ड्रॉप इन खेळपट्टीने दोन्ही संघाच्या खेळाडूंची चांगलीच कसोटी पहिली. फलंदाजी करण्यास कठीण असणाऱ्या खेळपट्टीवर चेंडू अनिश्चितपणे उसळत होता व फारसा वळत नव्हता. यामध्ये श्रीलंकेचे फलंदाज अपयशी ठरले आणि दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी धडपडत विजयी लक्ष्य गाठले. श्रीलंकेच्या माफक आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचेही फलंदाज गडबडले होते, मात्र संघाचा धोका टळेपर्यंत खेळपट्टीवर उभा राहिलेला क्विंटन डीकॉक (२०) आणि हेन्रीक क्लासन (नाबाद १९) यांच्या संयमाने दक्षिण आफ्रिकेला विजयी केले.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा कर्णधार वानिंदू हसारंगाचा निर्णय श्रीलंकेच्या चांगलाच अंगाशी आला. पहिलाच ट्वेन्टी-२० सामना खेळताना पहिल्याच चेंडूवर बार्टमनने पथुन निसांकाला बाद केले. त्यानंतक नॉर्किएने चेंडूला उंची देत फलंदाजांना मोठ्या खेळीच्या मोहात पाडत झेलबाद केले. मधल्या षटकांत महाराजने लागोपाठच्या चेंडूवर हसारंगा आणि समरविक्रमाला माघारी धाडले. रबाडाने तळाचे फलंदाज टिपले आणि श्रीलंकेचा डाव १९.१ षटकांतच गुंडाळला.

# भारत-आयर्लंड सामन्यावर पावसाचे सावट

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील आठवा सामना भारत आणि आयर्लंड यांच्यात बुधवारी (दि. ५) न्यूयॉर्कमधील नासाऊ क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाईल. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला आयर्लंडविरुद्धच्या विजयाने मोहिमेची सुरुवात करायची आहे.

न्यूयॉर्कमधील नासाऊ क्रिकेट स्टेडियमवर आतापर्यंत एकूण एक सामना खेळला गेला आहे. या सामन्यात गोलंदाजांचे पूर्ण वर्चस्व दिसून आले. तथापि, येथे भारत आणि बांगलादेश यांच्यात सराव सामनाही खेळला गेला, ज्यामध्ये भारतीय संघाने फलंदाजी करताना १८२ धावा केल्या होत्या.


# फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतून मेदवेदेवचे आव्हान संपुष्टात

## सिन्नेर, दिमित्रोव, सबालेन्का, रायबाकिनाची विजयी घोडदौड

**पॅरिस : वृत्तसंस्था**

जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या डॅनिल मेदवेदेवला ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्स डी मिनाऊरकडून फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पराभवाचा सामना करावा लागला. पुरुष एकेरीच्या अन्य सामन्यात इटलीचा यानिक सिन्नेर व बल्गेरियाच्या ग्रिगोर दिमित्रोव यांनी आपापल्या सामन्यात विजय नोंदवत उपांत्यपूर्व फेरी गाठली. महिला गटात अरिना सबालेन्का व कझाकस्तानची एलिना रायबाकिना यांनी विजय नोंदवत पुढच्या फेरीत धडक मारली.

मिनाऊरविरुद्धच्या सामन्यात पाचव्या मानांकित मेदवेदेव विजय मिळवेल असे दिसत होते. पहिला सेटही त्याने जिंकत चांगली सुरुवात केली, मात्र मिनाऊरने यानंतर मेदवेदेवला सामन्यात पुनरागमन करण्याची कोणतीच संधी न देता ४-६,



६-२, ६-१, ६-३ असे पराभूत करत धक्कादायक निकालाची नोंद केली. पुरुष एकेरीच्या अन्य सामन्यांमध्ये दुसऱ्या मानांकित सिन्नेरने फ्रान्सच्या कॉरेन्टिन मौटेटला २-६, ६-३, ६-२, ६-१ असे नमवले. तर, दिमित्रोवने पोलंडच्या हबर्ट हुरकाझला ७-६ (७-५), ६-४, ७-६ (७-३) अशा फरकाने पराभूत केले.

महिला एकेरीत दुसऱ्या मानांकित सबालेन्काने अमेरिकेच्या एमा नवारोवर ६-२, ६-३ असा सरळ सेटमध्ये विजय नोंदवला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच सबालेन्काने नवारोला पुनरागमनाची कोणतीच संधी दिली नाही, तर चौथ्या मानांकित रायबाकिनाने युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाला ६-४, ६-३ अशा फरकाने पराभूत केले. १२व्या मानांकित इटलीच्या जॅस्मिन पाओलिनीने एलिना अवानेस्यानचा ४-६, ६-०, ६-१ असा पराभव केला.

भारताचा रोहन बोपण्णा व त्याचा ऑस्ट्रेलियाचा साथीदार मॅथ्यू एब्डेन जोडीने पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीतील सामन्यात भारताचा एन.श्रीराम बालाजी आणि मेक्सिकोच्या मिगुएल रेयास-वरेला जोडीवर ६-७ (२-७), ६-३, ७-६ (१०-८) असा विजय मिळवला. सामन्यातील पहिला सेट गमावल्यानंतर बोपण्णा-एब्डेन जोडीने पुनरागमन करताना विजयाची नोंद केली.








अलिबाग : रायगड लोकसभा मतदारसंघातून विजय मिळविल्यानंतर महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे व सहकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. या वेळी मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार अनिकेत तटकरे, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.







पुणे : खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयाची हॅट्ट्रिक साधली. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून, फटाके वाजवून जल्लोष केला.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com